दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २९५ । शनिवार ८ ऑगस्ट २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## तृतीय पंथीयांना स्वयंरोजगारासाठी दोन लाखांपर्यंत अर्थसहाय्य



**मुंबई :** राज्य सरकारने तृतीयपंथीयांनाही स्वयंरोजगाराच्या माध्यमातून मूख्य प्रवाहात आणण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी बीज भांडवल योजना राबविण्यास मंजुरी देण्यात आली असून २५ हजारांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. तृतियपंथीयांसाठी कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाद्वारे शाश्वत रोजगार निर्माण करणे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासास चालना देणे. लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी बीज भांडवल उपलब्ध करून देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट असून यामध्ये तीन प्रकारच्या कर्ज योजनांचा समावेश करण्यात आला आहे. लघु कर्ज योजनेत २५ हजार रुपयांपर्यंत, मध्यम कर्ज योजनेत ५० हजार रुपयांपर्यंत तर दीर्घ कर्ज योजनेत २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

# ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी रुपये वर्ग

## कर्जमाफीत अहिल्यानगर आघाडीवर ; जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

- शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा अहिल्यानगर जिल्ह्यात शुभारंभ
- आधार प्रमाणीकरणामध्ये राज्यात प्रथम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला असून, कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ होऊन पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६९७.८१ कोटी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणाली द्वारे झालेल्या कर्ज वितरण शुभारंभास मंत्री विखे यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, सहकारी



संस्थांचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे सहभागी झाले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपये एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती.

त्यानुसार जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपयांचा लाभ देण्यात आला. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात आली. यात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकरी सभासदांना (पान ४ वर)

**या योजनेत जिल्ह्यातील एकूण २ लाख ३३ हजार ७११ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. पहिल्या यादीत १ लाख ३२ हजार ५९१ पात्र शेतकऱ्यांच्या समावेश आहे. त्यापैकी १ लाख १५ हजार ६९२ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. ८ हजार ३६३ शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.**

### ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांना मिळाले ५०२९ कोटी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या ५०२९ कोटी रुपयांचा हा पहिला हप्ता वर्ग करण्यात आला. या रकमेतून ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी करत असताना पहिल्या टप्प्यात कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण होईल, दुसऱ्या टप्प्यात प्रोत्साहनपर रक्कम वर्ग केली जाईल. अजूनही म्हणजे जवळपास हे १८ ते १९ लाख खाती जे आहेत त्याची प्रोसेस चालली आहे. १२ लाख खाती जी आहेत ती बँकांना परत पाठवलेली आहेत. कारण बँकांनी त्यात चुका केलेल्या आहेत. बँकांनी साधारणपणे आठवड्याभरामध्ये त्या खात्यांमध्ये सुधारणा करुन पाठवणार आहोत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

# महिलेवर अत्याचार करून दगडाने ठेचून निर्घृण हत्या

## पारनेरच्या कडूस गावातील संतापजनक घटना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील कडूस येथे ४२ वर्षीय महिलेवर अत्याचार करून दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) उघडकीस आली. या घटनेमुळे पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा कडूस ग्रामस्थांनी घेतला आहे. शुक्रवारी (दि. ७ ऑगस्ट) सकाळपासून ग्रामस्थांनी सुपा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले.

पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, मयत महिला दिशा चिंधे (नाव बदललेले) या गुरुवारी सकाळी नेहमीप्रमाणे फिरण्यासाठी घराबाहेर गेल्या होत्या. दुपारी ३.३० वा.च्या सुमारास कडूस–पाडळी रांजणगाव मार्गावरील लमाणबाबा टेकडीच्या पायथ्याजवळील शेतात त्यांचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळून आला. त्यांच्या डोक्यावर मोठ्या दगडाने प्रहार करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

या घटनेची माहिती मिळताच सुपा पोलिसांसह वरिष्ठ अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, डॉग स्कॉड, फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावरील पुरावे संकलित करण्यात आले असून मृतदेह शवविच्छेदनासाठी अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी सुपा पोलिसांनी अज्ञात ४ ते ५ इसमांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. दरम्यान, या अमानुष घटनेमुळे संतप्त झालेल्या कडूस ग्रामस्थांनी सुपा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. आरोपींना अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा निर्धार (पान ४ वर)

**आरोपींना अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास ग्रामस्थांचा नकार..**



- ही घटना अत्यंत दुर्दैवी असून महिलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आरोपींना तात्काळ अटक होईपर्यंत ग्रामस्थ आंदोलन मागे घेणार नाहीत.
**– मनोजकुमार मुंगसे**
(सरपंच, कडूस व भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष)

## SC-ST आरक्षणात 'क्रिमी लेयर'ला केंद्राचा विरोध; सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) आरक्षणामध्ये 'क्रिमी लेयर' तत्त्व लागू करण्याची तसेच सरकारी नोकऱ्यांसाठी अधिक न्याय्य आरक्षण धोरणाची मागणी करणाऱ्या जनहित याचिकांना केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात विरोध दर्शविला आहे. विद्यमान कायद्यानुसार डउ–डढ आरक्षणासाठी 'क्रिमी लेयर'ची कोणतीही तरतूद नसून ही संकल्पना केवळ इतर मागासवर्गीय (OBC) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (SEBC) आरक्षणापुरती मर्यादित असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, संबंधित जनहित याचिकांमुळे संविधानातील कोणत्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे याचिकांमधील मागण्या (पान ४ वर)

# फुकट योजनांपेक्षा रोजगार निर्मितीला प्राधान्य द्या

## सदाभाऊ खोत यांची सरकारला सूचना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्य सरकारने केवळ मोफत धान्य व विविध अनुदान योजनांवर भर न देता रोजगारनिर्मिती करणाऱ्या योजनांना प्राधान्य द्यावे, अशी भूमिका महायुतीचे विधान परिषदेचे आमदार सदाभाऊ खोत यांनी मांडली. फुकट धान्य आणि अनुदानाच्या योजना कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाहीत. लोकांच्या हाताला काम देणाऱ्या योजना राबविणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना खोत यांनी रोजगार, उद्योग, कर्जमाफी तसेच विरोधकांच्या भूमिकेवर भाष्य केले. (पान ४ वर)

### विरोधकांवरही टीका



**त्यांच्या सरकारच्या काळात किती मोठी कर्जमाफी झाली, याचा आधी हिशेब द्यावा. सध्याचे विरोधक समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवण्याऐवजी निरर्थक विषयांवर चर्चा करण्यात व्यस्त आहेत. सरकारच्या चुका दाखवून विधायक आणि दिशादर्शक भूमिका घेणे हेच विरोधकांचे खरे काम आहे.**
**–आ. सदाभाऊ खोत**

# मुकुंदनगरच्या दर्गा दायरा परिसरात महापालिका कर्मचाऱ्याला मारहाण : हल्लेखोर फरार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात महानगरपालिकेच्या एका कर्मचाऱ्यावर जमावाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दर्गादायरा कब्रस्तानजवळ पालिका कर्मचारी धीरज परदेशी यांच्यावर १० ते १५ जणांच्या टोळक्याने अचानक तुटून पडत त्यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत परदेशी हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर मॅक केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे. परदेशी याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांकडून मिळाली आहे.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती आटोक्यात आणली.

या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले असून, फरार झालेल्या इतर हल्लेखोरांचा कसून शोध सुरू आहे. धीरज परदेशी यांच्यावर हा हल्ला नेमक्या कोणत्या कारणातून झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस याप्रकरणी सखोल तपास करत आहेत.

याबाबत नागरिकांच्या चर्चेतून समजलेली सविस्तर माहिती अशी की, नगरच्या मुकुंद नगर परिसरातील दर्गादायरा भागात कब्रस्तानाजवळ महानगरपालिकेचे इलेक्ट्रिक विभागाचे कर्मचारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास काम करत होते. यावेळी घटनास्थळी आलेल्या एका जमावाने तुम्ही काय काम करता? असे म्हणून महापालिका कर्मचाऱ्यांना अरे रावी केली. यावेळी शाब्दिक बाचाबाची झाली. दरम्यान दहा ते बारा जणांच्या जमावाने मनपा कर्मचारी धीरज परदेशी यांच्या डोक्यावर लोखंडी सळईने घाव घालून गंभीर जखमी केले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. यामुळे मुकुंद नगर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी याला त्याच्याबरोबर असलेल्या इतर (पान ४ वर)

# अहिल्यानगरात ५२३ भावांनी लाटले लाडक्या बहिणींचे ७५ लाख!

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील गैरप्रकार उघड; प्रशासनाकडून वसुलीची मोहीम सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत अहिल्यानगर जिल्ह्यात धक्कादायक गैरप्रकार उघडकीस आला आहे. जिल्ह्यात तब्बल ५२३ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेत ७४ लाख ७५ हजार रुपयांची रक्कम उचलल्याचे पडताळणीत समोर आले असून, संबंधितांकडून रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली आहे.

जिल्हा प्रशासनाच्या तपासणीत



अनेक अर्जांमध्ये चुकीची माहिती भरल्याचे आढळले. काही ठिकाणी अर्ज करताना महिलांऐवजी पती किंवा मुलांचे आधार क्रमांक व बँक खात्याची माहिती देण्यात आली होती. काही प्रकरणांत अज्ञानामुळे चुका झाल्या, तर काही ठिकाणी जाणीवपूर्वक दिशाभूल केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे लाभाची रक्कम पुरुषांच्या खात्यात जमा झाली.

प्रशासनाने अशा सर्व प्रकरणांची छाननी करून संबंधित लाभार्थ्यांना नोटिसा पाठविण्यास सुरुवात केली आहे. काही लाभार्थी दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने वसुलीच्या कामात अडचणी येत असून, त्यांचा शोध घेण्याचे कामही सुरू आहे.

जिल्ह्यात या योजनेसाठी लाखो अर्ज प्राप्त झाले होते. त्यानंतर झालेल्या पडताळणीत हा गैरप्रकार उघड झाला. प्रशासनाने अपात्र लाभार्थ्यांकडून संपूर्ण रक्कम वसूल करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, यापुढे अशा प्रकारच्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी अधिक कठोर पडताळणी केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# पुण्यात लव्ह ट्रँगलचा थरार!

## शाळेतील प्रेमातून तरुणाचा खून

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** हिंडवडी परिसरात एका शाळेतील प्रेमाचा भयंकर अंत झाल्याचा धक्कादायक घटना समोर आली आहे. एका संतप्त तरुणाने आपल्या एक्स गर्लफ्रेंडच्या नव्या प्रियकराची निर्घृण हत्या केली आहे. एवढंच नाही तर तरुणीवरही जीवघेणा हल्ला केला आहे. या हत्याकांडात हिंजवडी पोलिसांनी आरोपी दिनेश महादेव झांबरे याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हिंजवडीतील एका सात मजली पीजीमधील हे धक्कादायक घटना आहे. सागर गायकवाड असं मृत व्यक्तीचं नाव आहे. सागर हा चार दिवसांपासून पीजीमध्ये व्यवस्थापक म्हणून काम करत होता. बुधवारी रात्री निकिता शिवाजी दनाने ही तरुणी पीजीमध्ये राहण्यासाठी आली. तिने एक महिन्यासाठी पीजी म्हणून रुम घेतली. तिने पीजी मालकाला सागर हा आपला बॉयफ्रेंड असल्याचे सांगितलं. त्यानंतर सागरने तिला तिसऱ्या मजल्यावरील ३१० क्रमांकाची खोली राहण्यासाठी दिली. पण गुरूवारी दुपारी निकिताचा शाळेतील प्रियकर दिनेश महादेल झांबरे पीजीमध्ये आला. त्याने सांगितलं मला सागरला भेटायचं आहे आणि निकिता माझी (पान ४ वर)

# ’लाईक्स’च्या नशेत हरवलेली पिढी...
## आणि समाजासमोर उभे राहिलेले डिजिटल संकट

प्रतीक शिंदे प्रकरण हे केवळ एका सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरच्या अटकेचे प्रकरण नाही; ते भारतातील डिजिटल समाजाच्या बदलत्या मानसिकतेचे धोकादायक प्रतिबिंब आहे. या प्रकरणातील आरोप न्यायालयात सिद्ध होणे बाकी आहे. मात्र, एखाद्या वादाचा शेवट कथित अपहरण, मारहाण आणि गुन्हेगारी आरोपांपर्यंत पोहोचतो, ही बाबच समाजाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारी आहे.

आज सोशल मीडिया हे संवादाचे माध्यम राहिलेले नाही; ते अनेकांसाठी ओळख, प्रतिष्ठा आणि करिअरचे साधन बनले आहे. ‘‘लाईक्स‘‘, ‘‘फॉलोअर्स‘‘ आणि ‘‘व्ह्यूज‘‘ यांनाच यशाचे मापदंड मानले जात आहेत. परिणामी, कंटेंटचा दर्जा, सामाजिक उपयुक्तता, नैतिकता आणि कायदेशीर जबाबदारी या गोष्टी दुय्यम ठरत आहेत. प्रसिद्धी मिळविण्यासाठी कोणतीही मर्यादा ओलांडण्याची मानसिकता वाढत आहे.

प्रतीक शिंदे हा पुण्यातील सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर आहे. तो इन्स्टाग्रामवर रील्स आणि स्टोरीजद्वारे एका चिनी बेटिंग ॲपचे प्रमोशन करत असल्याचा आरोप आहे.
त्याच्या सोशल मीडिया कंटेंटमुळे त्याला मोठी लोकप्रियता मिळाली होती.

मुंबईतील कंटेंट क्रिएटर चेतन चंद्रकांत देऊळगावकर गेल्या सुमारे आठ महिन्यांपासून बेटिंग ॲपचे प्रमोशन करणाऱ्या इन्फ्लुएन्सर्सवर टीकात्मक व्हिडिओ तयार करत होता. त्यामध्ये प्रतीक शिंदेचाही समावेश होता.काही महिन्यांपूर्वी चेतनला इन्स्टाग्रामवरून धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, चेतन देऊळगावकरने प्रतीक शिंदेच्या बेटिंग ॲप प्रमोशनवर टीका करणे थांबवावे, यासाठी व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे त्याचे कथित अपहरण करण्यात आले.चालत्या स्कॉर्पिओमध्ये त्याला मारहाण करून पुन्हा व्हिडिओ करू नयेत, अशी धमकी देण्यात आली. नंतर त्याला कळंबोली येथे सोडण्यात आले. या प्रकरणात प्रतीक शिंदे, यश बाबरे, अनिकेत गोडसे आणि समीर कुचेकर यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.




भारत हा जगातील सर्वाधिक इंटरनेट वापरणाऱ्या देशांपैकी एक आहे. देशातील इंटरनेटचा सर्वाधिक वापर व्हिडिओ स्ट्रीमिंग, सोशल मीडिया, मनोरंजन, ऑनलाइन गेमिंग, मेसेजिंग, ई-कॉमर्स, डिजिटल पेमेंट, शिक्षण, बातम्या आणि शॉर्ट व्हिडिओ कंटेंटसाठी होतो. विशेषतः १८ ते ३५ वयोगटातील तरुणांचा दिवसातील मोठा वेळ सोशल मीडियावर जात असल्याचे विविध अभ्यास दर्शवितात.

याचाच परिणाम सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या आकडेवारीत दिसतो. केंद्र सरकार आणि नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो च्या आकडेवारीनुसार देशात सायबर गुन्ह्यांची नोंद सातत्याने वाढत आहे. २०२२ मध्ये ६५ हजारांहून अधिक, २०२३ मध्ये ८६ हजारांहून अधिक, तर २०२४ मध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये सुमारे १८ टक्क्यांनी वाढ नोंदवली गेली. फसवणूक, बनावट गुंतवणूक, सोशल मीडिया फसवणूक, ओळख चोरी, सायबर स्टॉकिंग आणि ऑनलाइन ब्लॅकमेल ही प्रमुख गुन्हे आहेत.

सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर ही संकल्पना मुळात चुकीची नाही. अनेक निर्माते शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, वित्त, शेती, आरोग्य, प्रवास, विनोद, कला आणि सामाजिक जनजागृतीवर दर्जेदार काम करतात. भारतातील लोकप्रिय इन्फ्लुएन्सर्समध्ये प्रामुख्याने कॉमेडी, टेक्नॉलॉजी, शिक्षण, फिटनेस, फूड, फॅशन, ब्युटी, फायनान्स, गेमिंग आणि मोटिवेशन या विषयांवर काम करणारे निर्माते आघाडीवर आहेत. मात्र, त्यांच्याच लोकप्रियतेचा वरवरचा भाग पाहून अनेक तरुण ’व्हायरल होणे’ हेच अंतिम ध्येय समजू लागले आहेत. त्यामागील कौशल्य, सातत्य, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी मात्र अनेकदा दुर्लक्षित राहते.

सोशल मीडिया स्टार म्हणजे समाजाचा आदर्श का? असा प्रश्न प्रतीक शिंदे प्रकरणाने उपस्थित केला आहे. लाखो फॉलोअर्स म्हणजे चारित्र्य, विचार आणि नेतृत्वाची हमी नसते. प्रसिद्धी ही व्यक्तिमत्त्वाची परीक्षा नसून केवळ दृश्यमानतेचे मोजमाप आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला केवळ त्याच्या फॉलोअर्सच्या संख्येवरून आदर्श मानणे धोकादायक ठरू शकते.

आज गावोगावी एखादा सोशल मीडिया स्टार आला की त्याच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी गर्दी होते. तरुण त्याची जीवनशैली अनुकरण करतात. काही पालकही मुलांना अभ्यासापेक्षा सोशल मीडिया क्षेत्राकडे ढकलताना दिसतात. ही प्रवृत्ती चिंताजनक आहे. करिअर म्हणून डिजिटल माध्यमांची निवड चुकीची नाही; पण त्यासाठी कौशल्य, नैतिकता, कायद्याचे पालन आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची जोड तितकीच आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर देशात इंटरनेट साक्षरतेची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. शालेय अभ्यासक्रमात डिजिटल साक्षरता, सायबर सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक, माहितीची पडताळणी, गोपनीयतेचे संरक्षण आणि सोशल मीडिया जबाबदारी हे विषय अनिवार्य झाले पाहिजेत. पालकांनी मुलांच्या ऑनलाइन वर्तनाकडे लक्ष द्यावे, तर सरकार, शाळा, महाविद्यालये आणि तंत्रज्ञान कंपन्यांनीही संयुक्तपणे डिजिटल जबाबदारीची संस्कृती निर्माण करणे आवश्यक आहे.

प्रतीक शिंदे प्रकरणाचा अंतिम निकाल न्यायालय देईल. त्यामुळे कोणत्याही आरोपीला न्यायालयीन प्रक्रियेपूर्वी दोषी ठरविणे योग्य नाही. मात्र । घटनेने दिलेला सामाजिक संदेश अत्यंत स्पष्ट आहेमोबाईलच्या पडद्यावर मिळणारी टाळी क्षणभंगुर असते; पण चुकीच्या कृतीची किंमत आयुष्यभर मोजावी लागू शकते.

आज गरज आहे ती डिजिटल प्रसिद्धीपेक्षा डिजिटल जबाबदारीची. अन्यथा इंटरनेट हे ज्ञानाचे साधन न राहता समाजातील अविवेक, गुन्हेगारी आणि दिशाभूल यांचे सर्वात प्रभावी माध्यम ठरण्याचा धोका अधिक गडद होत जाईल. आणि त्या दिवशी आपल्या घरात शिरलेला सर्वात मोठा शत्रू बाहेरचा नसून आपल्या हातातील मोबाईलच असेल.

# कामिका एकादशीनिमित्त रविवारी पुणतांब्यात चांगदेव महाराज यात्रा

### दोन लाख भाविकांच्या उपस्थितीचा अंदाज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा ।** महाराष्ट्राची ‘दक्षिण काशी’ म्हणून ओळख असलेल्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथे कामिका एकादशीनिमित्त रविवारी चांगदेव महाराजांची पारंपरिक यात्रा मोठ्या उत्साहात भरत आहे. यंदा गोदावरी नदीला मुबलक पाणी असल्याने भाविकांना पवित्र स्नानाचा लाभ मिळणार असून सुमारे दोन लाख भाविक चांगदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



पंढरपूरच्या आषाढी एकादशीनंतर पुणतांब्यातील ही यात्रा भरते. पांडुरंगाच्या दर्शनानंतर चांगदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतल्यावरच आषाढी वारी पूर्ण होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. यात्रेनिमित्त संभाजीनगर, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतून शेकडो पायी दिंड्या पुणतांब्यात दाखल होणार असून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात येणार आहे.

देवस्थानने दर्शनरांग, सुलभ दर्शन व्यवस्था तसेच प्रथमच एलईडी स्क्रीनवरून चांगदेव महाराजांचे दर्शन घेण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. यात्रेनिमित्त रहाटपाळणेही दाखल झाले असून पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे १७९ व्या सद्गुरू गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाची घोषणा याच दिवशी होणार असून सप्ताहाचा नारळ सरला बेटाचे महंत रामगिरीजी महाराज यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज आश्रमात महंत रामगिरीजी महाराजांचे कीर्तन होणार आहे. काशीविश्वेश्वर मंदिर व मुक्ताई ज्ञानपीठातही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**रस्त्याची दुरुस्ती पूर्ण**

पुणतांबा-श्रीरामपूर मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास होत होता. माजी सरपंच डॉ. धनंजय धनवटे यांच्या पाठपुराव्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यावरील खड्डे बुजवून दुरुस्ती पूर्ण केली आहे. त्यामुळे यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आ. काळे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदारसंघाचे आमदार आशुतोष काळे यांचा वाढदिवस कोपरगाव मतदारसंघात विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रम राबवून साध्या पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. नेहमीच्या राजकीय जल्लोषाला बाजूला ठेवून जनसेवेचे व्रत अंगीकारत कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

तहसील कार्यालय कोपरगाव व अंजनापूर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमानाने नागरिकांसाठी एका विशेष महसूल व रेशन कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी रेशनकार्डशी मोबाईल क्रमांक जोडणे, रेशन कार्ड विभक्त करणे, अन्न सुरक्षा योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांची नावे समाविष्ट करणे तसेच रेशन कार्ड जोडणी अशा विविध गरजू सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जेऊर कुंभारीत आमदार आशुतोष काळे मित्र मंडळाच्या वतीने गंगेश्वर महादेव मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

# ॲट्रॉसिटी व विनयभंगाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** ॲट्रोसीटी व विनयभंगाचा गुन्हा दाखल केला म्हणुन समोरील लोकांवर विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केल्याचे राहुरी येथील न्यायालयात सिद्ध झाले. सदर खटल्याचा निकाल देत न्यायालयाकडून पाच आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द येथे दि. ५ जून २०२१ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास शेतामधील पिक जनावरे खाऊ लागल्याच्या कारणावरुन वाद झाले होते. त्यावेळी साळवे यांच्या फिर्यादीवरून आरोपींवर ॲट्रोसीटी व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तर दुसऱ्या गटातील एका महिलेने साळवे यांच्यावर विनयभंग व मारहाणीचा गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सहाय्यक फौजदार सी. एन. बऱ्हाटे यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासा अंती राहुरी येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायाधीश अनुपमा पारशेट्टी यांच्या समोर सदर खटल्याची सुनावणी सुरु झाली. दरम्यान न्यायाधीश यांनी फिर्यादी पक्षाचे एकंदरीत पुराव्याची पडताळणी करून एकूण सहा साक्षीदार तपासले. आरोपी पक्षाच्या वतीने अँड. सुरज बिहाणी यांनी घेतलेल्या उलट तपासात फिर्यादी महिलेने व तिच्या पतीने काय फिर्याद दाखल करायची याबाबत चर्चा केली असल्याचे व पोलिसांनी तिच्या सांगण्या प्रमाणे तपास केल्याचे मान्य केले आहे. तसेच यातील आरोपींनी ॲट्रॉसिटी व विनयभंगाची केस दाखल केली असल्यामुळे नाइलाजास्तव सदरील केस त्यांच्या विरुध्द दाखल केली असल्याचे मान्य केले. त्यानंतर या खटल्या बाबत न्यायाधीश पारशेट्टी यांनी दोन्ही पक्षाकडील युक्तीवाद ऐकुन दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी सदर खटल्याचा निकाल दिला. त्यानुसार या खटल्यातील आरोपी अमोल वसंत साळवे, अंतवन योहान साळवे, कुसूम अंतवन साळवे, विमल वसंत साळवे, मनिषा वसंत साळवे व १ अल्पवयीन मुलगा अशा सहा जणांची न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपीकडून ॲड. सुरज बिहाणी यांनी न्यायालयाचे कामकाज पाहिले, त्यांना अँड. फैजान मनियार यांनी सहाय्य केले. निकाला नंतर अंतवन साळवे यांनी न्यायालयाचे व ॲड. सुरज बिहाणी यांचे आभार व्यक्त केले.

# १.३० कोटींच्या विविध विकासकामांच्या निविदा प्रसिद्ध : आ. काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी तसेच ग्रामीण व नागरी भागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने महायुती शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी सुमारे १ कोटी ३० लाख रुपयांच्या कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.

मतदार संघातील रस्ते, सार्वजनिक सुविधा, सामाजिक व धार्मिक स्थळांचा विकास आणि सांस्कृतिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देत शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आमदार काळे सातत्याने प्रयत्नशील आहेत. या निधीमुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती मिळणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.



प्रसिद्ध झालेल्या निविदांमध्ये माहेगाव देशमुख येथील ६ चारी रस्ता ते भिकनभाई सय्यद वस्ती (ग्रामीण मार्ग क्र.२१) रस्ता मजबुतीकरण करण्यासाठी ४० लाख रुपये, कोळगाव थडी येथील ग्रामीण मार्ग क्र.२९ ते इब्राहिम शेख वस्ती रस्ता काँक्रीटीकरण करण्यासाठी ३५ लाख रुपये, वेस येथील मुस्लीम मोहल्ल्यात सांस्कृतिक सभागृह बांधण्यासाठी २० लाख रुपये, चितळी येथील कब्रस्तान संरक्षक भिंत बांधण्यासाठी २० लाख रुपये, तसेच रवंदे येथील कब्रस्तान सुशोभीकरण व सी.डी.वर्क करण्यासाठी १५.५० लाख रुपये मंजूर झाले असून या सर्व कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्या आहेत.

य ा विकासकामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष कामांना प्रारंभ होणार आहे. रस्ते, सार्वजनिक सुविधा, सामाजिक व धार्मिक स्थळांचा विकास यामुळे नागरिकांच्या अडचणी कायमच्या दूर होणार असून संबंधित गावांतील नागरिकांना दर्जेदार रस्ते, सुरक्षित सार्वजनिक सुविधा आणि आवश्यक सामाजिक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे चितळी, वेस, माहेगाव देशमुख, कोळगाव थडी, रवंदे आदी गावांमध्ये समाधानाचे वातावरण असून नागरिकांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

> कोपरगाव मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे. कोपरगाव मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. विकासकामांसाठी निधी आणण्याची ही प्रक्रिया यापुढेही अधिक वेगाने निरंतर सुरु राहील.-
> **आ. आशुतोष काळे.**

# हरिनामाच्या गजरात श्री क्षेत्र कोळपेवाडीच्या पायी दिंडीचे पुणतांब्याकडे उत्साहात प्रस्थान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** भगवान श्री सिद्धेश्वराच्या कृपाआशीर्वादाने तसेच भागवताचार्य परमपूज्य गोवर्धनजी महाराज (सुरेगाव आश्रम) यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त कोळपेवाडी, शहाजापूर, माहेगाव देशमुख, कोळगाव थडी व पंचक्रोशीतील वारकरी मंडळांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या श्री क्षेत्र कोळपेवाडी येथून निघणाऱ्या पायी दिंडीचे सोहळ्याचे सलग बाराव्या वर्षी श्री क्षेत्र पुणतांब्याकडे शुक्रवार (दि.७) रोजी सकाळी भक्तिमय वातावरणात उत्साहात प्रस्थान झाले.



श्री क्षेत्र कोळपेवाडी येथे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. दिंडीत सहभागी वारकऱ्यांना चहा, नाश्ता देण्यात आला. त्यानंतर ‘ज्ञानोबा-तुकाराम’, ‘रामकृष्ण हरी’ आणि ‘विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल’ या अखंड नामघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भगव्या पताकांच्या साक्षीने दिंडी पुणतांब्याकडे मार्गस्थ झाली. दिंडी प्रस्थानाच्या वेळी वातावरणात भक्तीचा अपूर्व उत्साह संचारला होता.यावेळी निसर्गानेही वारकऱ्यांवर कृपावर्षाव केला. दिंडी प्रस्थान होताच हलक्या पावसाच्या सरी बरसल्या आणि जणू वरुणराजाने वारकऱ्यांवर आशीर्वादाचा वर्षावच केला. या प्रसन्न वातावरणामुळे वारकऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.दिंडीला शुभेच्छा देण्यासाठी कोळपेवाडीसह शहाजापूर, माहेगाव देशमुख, कोळगाव थडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, वारकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखीवर पुष्पवृष्टी करून तसेच टाळ-मृदंगाच्या गजरात भाविकांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी विठ्ठलभक्तांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# प्रा. बी. एच. तेलोरे यांना पीएचडी जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** ॲड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र विषयाचे प्रा. बी. एच. तेलोरे यांनी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवसंजीवन योजनेची अंमलबजावणी व मूल्यमापन या विषयावर सखोल संशोधन करून सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाकडून पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. प्रा. बी. एच. तेलोरे यांनी आपल्या संशोधनामध्ये नवसंजीवन योजनेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अभ्यास केला. तसेच योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी, लाभार्थ्यांवरील परिणाम, प्रशासनिक कार्यपद्धती आणि योजनेची परिणामकारकता यांचे सखोल मूल्यमापन केले.

प्रा. बी. एच. तेलोरे यांनी या यशाचे श्रेय आपल्या संशोधन मार्गदर्शक प्रो. डॉ. सुरेश देवरे सर व प्राचार्य डॉ. विलास आवारी सर,वडील कै. हरिदास तेलोरे व कुटुंबीय, सहकारी तसेच संशोधन कार्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संबंधितांना दिले आहे. त्यांच्या या



उल्लेखनीय यशामुळे सत्यनिकेतन संस्थेचे सचिव एम.एल. मुठे साहेब, माजी प्राचार्य टी. एन. कानवडे सत्यनिकेतन संस्थेचे सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. भाऊसाहेब देशमुख व सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लेंडी बागेचे पावित्र्य की मंदिराची स्थापना ?
## शिर्डीतील वादाचा सुवर्णमध्य कोणता ?

**अशोक दुशिंग**

शिर्डीतील श्री साईबाबा संस्थानने लेंडी बाग परिसरात प्रभू श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या ऐतिहासिक मूर्तींची स्वतंत्र मंदिरात प्रतिष्ठापना करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भाविक, ग्रामस्थ आणि साई अभ्यासकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. हा वाद राम किंवा कृष्ण मंदिराला विरोधाचा नसून, मंदिरासाठी निवडलेल्या जागेचा आहे. त्यामुळे हा विषय श्रद्धा, इतिहास, वारसा संवर्धन आणि स्थानिकांच्या भावनांशी निगडित असल्याने त्याकडे संयमाने पाहण्याची गरज आहे.




यसंस्थानच्या भूमिकेनुसार, साईबाबांच्या हयातीत नागपूरचे गोपाळराव (बापूसाहेब) बुटी यांनी उभारलेल्या दगडी वाड्यात प्रभू श्रीराम आणि मुरलीधर श्रीकृष्ण यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचा संकल्प होता. या मूर्ती नागपूरहून शिर्डीतही आणण्यात आल्या होत्या. मात्र, साईबाबांच्या महासमाधीनंतर त्याच ठिकाणी समाधी मंदिर उभारण्यात आल्याने मूर्तींची प्रतिष्ठापना होऊ शकली नाही. गेली तब्बल ११० वर्षे या मूर्ती संस्थानच्या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. या ऐतिहासिक वारशाला योग्य स्थान मिळावे आणि बाबांच्या काळातील अपूर्ण राहिलेली संकल्पना पूर्ण व्हावी, ही संस्थानची भूमिका आहे.

संस्थानच्या मते, लेंडी बाग परिसरात मंदिर उभारल्यास रामनवमी आणि गोकुळाष्टमीसारखे उत्सव अधिक भव्य स्वरूपात साजरे करता येतील. तसेच शिर्डीत येणाऱ्या लाखो भाविकांना साईबाबांच्या दर्शनासोबतच बाबांच्या काळाशी संबंधित ऐतिहासिक मूर्तींचे दर्शन घेण्याची संधी मिळेल. त्यामुळे शिर्डीच्या धार्मिक आणि आध्यात्मिक पर्यटनालाही नवी दिशा मिळू शकते.

मात्र, ग्रामस्थांची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. लेंडी बाग हे केवळ उद्यान नाही, तर साईबाबांच्या साधना, चिंतन आणि एकांताचे पवित्र स्थान आहे. नंदादीप, पवित्र वृक्ष आणि बाबांच्या वास्तव्याशी संबंधित अनेक ऐतिहासिक स्मृती या परिसरात आहेत. येथे मोठे बांधकाम झाल्यास बागेचे नैसर्गिक आ ण ऐतिहासिक स्वरूप बदलण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. त्यांच्या मते, मंदिर जरूर उभारावे; परंतु ते संस्थानच्या अन्य उपलब्ध जागेत, विशेषतः वीरभद्र मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत उभारल्यास मूर्तींची प्रतिष्ठापनाही होईल आणि लेंडी बागेचे पावित्र्यही कायम राहील. शिवाय त्या भागाचा विकास होऊन भाविकांची गर्दीही विभागली जाईल.

या संपूर्ण वादात दोन्ही बाजूंच्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. संस्थान ऐतिहासिक वारसा जपण्याचा प्रयत्न करीत आहे, तर ग्रामस्थ लेंडी बागेचे मूळ स्वरूप आणि साईबाबांच्या साधनास्थळाचे पावित्र्य टिकवण्याची भूमिका घेत आहेत. त्यामुळे हा संघर्ष नसून श्रद्धेच्या दोन सकारात्मक भूमिका असल्याचे स्पष्ट होते.

अशा वेळी संस्थान, ग्रामस्थ, इतिहास अभ्यासक, वास्तुविशारद आणि साईभक्त यांच्यात खुला संवाद होणे आवश्यक आहे. सर्व संबंधितांना विश्वासात घेऊन निर्णय झाल्यास भविष्यात कोणताही वाद निर्माण होणार नाही. साईबाबांनी नेहमीच श्रद्धा, सबुरी आणि समन्वयाचा संदेश दिला. त्यामुळे त्यांच्याच शिकवणुकीनुसार परस्पर संवादातून तोडगा काढणे हेच योग्य ठरेल.

शिर्डी ही केवळ धार्मिक स्थळ नाही, तर ती श्रद्धा, इतिहास आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे. त्यामुळे श्रीराम-कृष्ण मंदिराची स्थापना आणि लेंडी बागेचे ऐतिहासिक पावित्र्य या दोन्ही गोष्टी जपणारा सर्वमान्य निर्णय झाला, तर तोच साईबाबांच्या विचारांना आणि शिर्डीच्या परंपरेला साजेसा खरा सुवर्णमध्य ठरेल.

# साकूरमध्ये भटकणाऱ्या मनोरुग्ण महिलेला ‘माऊली’चा आधार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी ।** संगमनेर तालुक्यातील साकूर गावात काही दिवसांपासून भटकत असलेल्या एका अज्ञात मनोरुग्ण महिलेला अखेर सुरक्षित निवारा मिळाला आहे. साकूर ग्रामपंचायत, आशा सेविका आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून या महिलेला अहिल्यानगर येथील माऊली सेवाभावी प्रतिष्ठानमध्ये दाखल करण्यात आले.

ही महिला काही दिवसांपासून बसस्थानक, बाजारतळ व मंदिर परिसरात वास्तव्यास होती. तिच्या मनोरुग्ण अवस्थेचा गैरफायदा घेत काही टवाळखोर व मद्यधुंद व्यक्ती तिला त्रास देत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. यानंतर रिक्षाचालक व सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे यांनी ही बाब ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आणून दिली.

उपसरपंच तथा बाजार समितीचे सभापती शंकरराव पाटील खेमनर यांनी तातडीने डॉ. राजेंद्र धामणे यांच्याशी संपर्क साधला. आशा सेविकांनी महिलेची प्राथमिक चौकशी केली. मात्र ती मनोरुग्ण असल्याने कोणतीही माहिती देऊ शकली नाही. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून डॉ. धामणे यांनी महिलेला माऊली सेवाभावी प्रतिष्ठानमध्ये दाखल केले.

या संवेदनशील उपक्रमामुळे महिलेला सुरक्षित आश्रय मिळाला असून ग्रामपंचायत, आशा सेविका, डॉ. राजेंद्र धामणे तसेच सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे यांच्या कार्याचे साकूर परिसरातून कौतुक होत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## तालुका पेन्शन असोसिएशनची मासिक सभा आज

**शिरसगाव** : श्रीरामपूर येथील तालुका पेन्शन असोसिएशन ची माहे ऑगस्ट महिन्याची मासिक सभा शनिवारी दुपारी पाच वाजता चौकात होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे अशी माहिती सचिव के पी बोरुडे यांनी दिली आहे. या कार्यक्रमात ज्या सभासदांचे वाढदिवस आहे ते साजरी केली जाते. तसेच इतिवृत्त वाचन व जमा करता हिशोब दिला. जाईल त्याचप्रमाणे पेन्शनरच्या विविध प्रश्नावर चर्चा होईल तरी सर्वांनी या सभेस उपस्थित राहावे असे आव्हान प्राचार्य टीव्ही शेळके, प्रा. शंकरराव अनारसे, प्रा सुभाष लिंगायत, प्रा. शंकरराव घागरे, लक्ष्मणराव निकम, सी के भोसले, दिघे बाबा, अब्दुल पठाण, प्रभावती नाईक, प्रभा विधाते, निर्मला निकम, सरस्वती शिंदे आदी मान्यवर केले आहे.

## संत निरंकारी मंडळाच्या वतीने रविवारी सोनईत रक्तदान शिबिराचे आयोजन

**सोनई** : सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांचे प्रेरणेने संत निरंकारी चॅरिटेबल फौंडेशनच्या सोनई शाखेच्या वतीने रविवार ९ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सोनई शाखेचे मुखी विठ्ठल जी खाडे महाराज यांनी सांगितले. विश्वलक्ष्मी मंगलकार्यालय, ढाले कॉम्प्लेक्स, घोडेगाव रोड, सोनई येथे रविवार ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ३ वाजेपर्यंत रक्तदान होणार आहे. मानवतेच्या या महान कार्यात सर्वानीच सहभागी व्हावे, असे आवाहन सोनई ब्रांच मुखी विठ्ठल जी खाडे यांनी केले आहे.

# प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे आधुनिक ऊस उत्पादन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी वरदान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : राज्यातील ऊस शेती अधिक उत्पादनक्षम, कमी खर्चिक आणि शाश्वत करण्याच्या उद्देशाने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेने आधुनिक ऊस उत्पादन तंत्रज्ञान विकसित केले आहे. दर्जेदार रोपवाटिका, ठिबक सिंचन आणि विद्राव्य खतांच्या शास्त्रीय वापरामुळे ऊस उत्पादनात वाढ होण्याबरोबरच अधिक साखर उतारा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला आहे. संचालक प्रा. डॉ. उत्तमराव कदम यांच्या नेतृत्वाखाली संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी हे तंत्रज्ञान विकसित केले. या पद्धतीत गांडूळखत, कोकोपीट, बुरशीनाशक आणि सुपर फॉस्फेटच्या संतुलित मिश्रणातून तयार केलेल्या माध्यमात अवघ्या ३० ते ३५ दिवसांत लागवडीयोग्य ऊस रोपे तयार केली जातात.

एका एकरासाठी केवळ ६००० ते ६५०० रोपे पुरेशी ठरत असून ४.५ बाय १.५ फूट अंतरावर लागवड केली जाते. त्यामुळे मुळांची वाढ चांगली होऊन फुटव्यांची संख्या वाढते. ठिबक सिंचनासोबत युरिया, १९:१९:१९, ०:५२:३४ आणि ०:०:५० या विद्राव्य खतांचा शास्त्रीय वापर केल्याने पाणी व खतांची बचत होत उत्पादन खर्च कमी होतो. सध्या को-८६०३२ आणि फुले-०२६५ या ऊस जातींचे प्रात्यक्षिक राबविण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी संशोधनाधारित तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. तर संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी हे तंत्रज्ञान राज्यातील ऊस उत्पादकांसाठी दिशादर्शक ठरेल, असे सांगितले. संशोधनाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणारा हा उपक्रम ऊस शेतीसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## कांगोणी येथे 'प्लांट क्लिनिक'द्वारे शेतकऱ्यांना एकात्मिक पीक व्यवस्थापनाचे मार्गदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : कृषी महाविद्यालय, सोनईच्या ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव (ठ-थए) २०२६-२७ कार्यक्रमांतर्गत कांगोणी (ता. नेवासा) येथील जिल्हा परिषद शाळेत 'प्लांट क्लिनिक' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कृषिकन्यांनी शेतीतील विविध समस्या, त्यावरील उपाययोजना आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना दिली. उपक्रमात मृदाशास्त्र, कृषी कीटकशास्त्र, वनस्पती रोगशास्त्र आणि कृषीशास्त्र विषयांवरील माहितीपूर्ण चार्ट तसेच माती, कीड, रोगग्रस्त पाने, तण व विविध पिकांचे प्रत्यक्ष नमुने प्रदर्शित करण्यात आले. माती परीक्षणाचे महत्त्व, संतुलित खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच प्रभावी तण नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विविध कीटकनाशके, बुरशीनाशके व कृषी रसायनांच्या सुरक्षित वापराबाबतही माहिती देण्यात आली. कार्यक्रम अधिकारी प्रा. दिशा चव्हाण यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. उपक्रमासाठी प्रा. सचिन खाटीक, प्रा. योगिनी गागरे, प्रा. नरेंद्र दहातोंडे व प्रा. रेणुका दिघे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे व कार्यक्रम समन्वयक प्रा. अनुप दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. उपस्थित शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करून अशा कार्यक्रमांची सातत्याने गरज व्यक्त केली.

## 'द फेस ऑफ महाराष्ट्र-२०२६'मध्ये वैजापूरच्या प्रियंका वाघचा मानाचा तुरा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : कोपरगाव येथे आयोजित राज्यस्तरीय 'द फेस ऑफ महाराष्ट्र-२०२६' या प्रतिष्ठेच्या फॅशन शो स्पर्धेत वैजापूरच्या प्रियंका रमेश वाघ हिने प्रथम क्रमांक पटकावत राज्यात अव्वल स्थान मिळवले. बाभळेश्वर येथील सुनिल पाटील फिल्म प्रॉडक्शनच्या वतीने आयोजित या स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ८० स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेच्या विविध फेऱ्यांमध्ये प्रियंका वाघ हिने आत्मविश्वासपूर्ण रॅम्पवॉक, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्कृष्ट स्टेज प्रेझेन्स आणि आकर्षक सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

तिच्या यशामागे मेकअप आर्टिस्ट व ड्रेस डिझायनर शोभा गायकवाड यांच्या कलात्मक मेकअप व वेशभूषेचेही महत्त्वपूर्ण योगदान ठरले. कार्यक्रमाचे आयोजन सिनेअभिनेते सुनिल पाटील व करिष्मा हलवाई यांनी केले होते. यावेळी ज्येष्ठ अभिनेते विजय पाटकर, अभिनेत्री आंचल चव्हाण, अभिनेते अर्जुन आंबेकर, लेखक वैभव ढुस यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला. प्रियंका वाघच्या या यशामुळे वैजापूर शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## त्रिमूर्ती महाविद्यालयात गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांना अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे महान साहित्यिक, तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात टागोर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. वक्त्यांनी टागोर यांच्या साहित्य, शिक्षण आणि समाजसुधारणेतील योगदानाचा आढावा घेतला. 'गीतांजली' या काव्यसंग्रहासाठी त्यांना १९१३ मध्ये साहित्यातील नोबेल पारितोषिक मिळाले असून हा सन्मान मिळवणारे ते पहिले भारतीय व पहिले आशियाई साहित्यिक ठरले. शांतिनिकेतन येथील विश्वभारती विद्यापीठाची स्थापना तसेच भारताचे 'जन गण मन' आणि बांगलादेशचे 'आमार सोनार बांगला' ही राष्ट्रगीते त्यांच्या लेखणीतून साकारल्याचा गौरवही यावेळी अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमास उपप्राचार्या बर्गे, प्रा. वैरागर, कदम, काकडे, सोनवणे, देवकर, कराडे, राव, ढाकीफळे, औटी, गायकवाड, भदगले, भोसले आदी प्राध्यापक उपस्थित होते.

## राहुरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कमानीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहरातील राजवाडा परिसरात महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य समाजमंदिर व वाचनालयाची इमारत आहे तरी राजवाडा परिसरात राज्यातील व जिल्ह्यातील मान्यवर भेट देण्यासाठी येतात परंतु राजवाडा परिसराकडे येण्यासाठी नगर मनमाड मार्गावरुन कोणत्याही प्रकारचा प्रवेश मार्ग नाही या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रवेश कमान बांधण्यात यावे यासाठी राहुरी नगर परिषदेला निवेदन देण्यात आले. निवेदनावर रिपाइंचे राहुरी तालुकाध्यक्ष विलास साळवे, वंचितचे जिल्हा संपर्कप्रमुख पिंटू नाना साळवे, विरोधी पक्षनेते अरुण साळवे, माजी नगरसेवक सुनील पवार, दादु साळवे, नवीन साळवे, रिपाई शहर अध्यक्ष सुनील चांदणे, भैय्यासाहेब आढाव, नितीन मकासरे, पप्पु शिंदे, धनु साळवे, राजेश बागुल, प्रकाश कर्डक आदींचा सह्या आहेत.

## संगमनेर तालुक्यासाठी ३५७ मेट्रिक टनचा बफार स्टॉक खुला



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यात शेतकऱ्यांना युरिया खताची कमतरता भासू नये, यासाठी आमदार अमोल खताळ यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना उर्वरित बफर स्टॉक खुला करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार कृषी विभागाने नियोजन करून सुमारे ३५७ मेट्रिक टन युरियाचा संरक्षित साठा खुला केला असून, हा साठा आता विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. संगमनेर तालुक्यात खरीप हंगाम २०२६-२७ साठी एकूण ७०० मेट्रिक टन युरिया उपलब्ध करून देण्यात आला होता.

त्यापैकी सुरुवातीच्या टप्प्यात ३४९ मेट्रिक टन युरिया तातडीने विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, खरीप हंगामात शेतकऱ्यांकडून युरियाची वाढती मागणी होत असल्याने शिल्लक संरक्षित साठ्यातील युरिया उपलब्ध करून देण्याच्या सूचना आमदार खताळ यांनी कृषी विभागाला केल्या.

त्यानुसार उर्वरित सुमारे ३५७ मेट्रिक टन बफर स्टॉक खुला करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार युरिया उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### कृत्रिम टंचाई करणाऱ्यांवर कारवाई

कृषी विभागाच्या नियोजनामुळे तालुक्यात युरियाचा तुटवडा निर्माण होणार नाही. शेतकऱ्यांना अधिकृत विक्रेत्यांकडूनच युरिया उपलब्ध करून देण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कृषी सेवा केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांकडून जादा दर आकारला जात असल्यास किंवा खताची कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्यास संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, असे देखील आमदार अमोल खताळ यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे.

## अल्पवयीन विद्यार्थिनीच्या घरात घुसून विनयभंग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील तांदुळनेर परिसरात एका १६ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी तसेच घरात घुसून पुन्हा गैरवर्तन केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतप्त ग्रामस्थांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना ५ ऑगस्ट रोजी घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी विद्यार्थिनी महाविद्यालयातून घरी परतत असताना आरोपी प्रीतम मच्छिंद्र शिरसाठ (रा. पाटीलवाडी, कोल्हार खुर्द, ता. राहुरी) याने तिचा रस्ता अडवून विनयभंग केला व धमकी दिल्याचा आरोप आहे. त्यानंतर दुपारी सुमारे २ वाजता विद्यार्थिनी घरी एकटी असताना आरोपी घरात घुसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थिनीने आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना ग्रामस्थांनी त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पीडित विद्यार्थिनीच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम, २०१२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघमारे करीत आहेत.

## आश्वी गटातील रस्त्यांचा बोजवारा; वाहनधारकांचा जीव मुठीत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : शिर्डी विधानसभा मतदारसंघातील आश्वी जिल्हा परिषद गटातील बहुतांश रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून नागरिकांचे आणि वाहनधारकांचे हाल होत आहेत. रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे चालणेही कठीण झाले असून नेमका रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत. आश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथील इरिगेशन बंगला ते आश्वी खुर्द दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून सर्वत्र लहान मोठे खड्डे बघावयास मिळत आहे. या मार्गावरून होणाऱ्या अवजड वाहनांच्या नियमित वर्दळीमुळे खड्ड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याचबरोबर दाढ खुर्द, शिबलापूर, पिंप्री-लौकी, मांची फाटा ते आश्वी बुद्रुक या रस्त्यांवर देखील खड्डे पडले आहेत. पाऊस झाल्यानंतर रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही. परिणामी दुचाकी घसरून लहान-मोठे अपघात दररोज घडत आहेत. लहान मुले, विद्यार्थी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांना या जीवघेण्या प्रवासाचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वाहनधारकांसोबतच पायी चालणाऱ्या प्रवाशांनाही विशेषतः विद्यार्थ्यांना आपला जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाकडून दरवेळी केवळ तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजवून वेळ मारून नेली जाते, असा ग्रामस्थांचा आरोप आहे. त्यामुळे प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, तात्काळ या सर्व नादुरुस्त रस्त्यांवरील खड्डे बुजवून वाहतूकीसाठी रस्ते सुरक्षित करावेत आणि केवळ मलमपट्टी न करता दर्जेदार व टिकाऊ रस्त्याची निर्मिती करावी, अशी मागणी आश्वी परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## नेवासा जि प शाळेत राष्ट्रीय नशामुक्ती जनजागृती अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : नेवासा खुर्द येथील जिल्हा परिषद सेमी इंग्लिश शाळेमध्ये दि.६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधीत देशभर राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय नशामुक्ती जनजागृती अभियानाचा शुभारंभ नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल यांच्या हस्ते व प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय नेवासा येथील ओम शांती केंद्राच्या राजयोगिनी वंदना दिदी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी भावी पिढीसमोर नशामुक्ती अभियानाचा उद्देश विषद करून सामूहिक प्रतिज्ञाद्वारे जनजागृती करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी गटविकास अधिकारी संजय लखवाल,राजयोगिनी वंदना दिदी,केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद,मुख्याध्यापक असिफ शेख सर,मच्छिंद्र देठे,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण,अर्जुन धानापुणे,कु. साक्षी लहिरे, वैभव चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक असिफ शेख सर यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. गटविकास अधिकारी संजय लखवाल म्हणाले की नशा ही लागलेली कीड असून यामुळे व्यसनी माणसाचे सर्व कुटुंब उध्वस्त होते. या अभियानाद्वारे व्यसनांपासून मुक्त होण्याचा संदेश द्यायचा आहे, मोबाईल हे एक व्यसनच असल्याने मुलांनी त्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करावा.

या प्रसंगी शिक्षक आण्णासाहेब शिंदे,शिक्षिका सुनिता कर्जुले-राऊत, कामिनी बायस, संध्या लोंढे-नांगरे,विद्या खामकर,ज्योती गाडेकर,मिनाक्षी लोळगे,अर्चना बोकारे, अश्विनी मोरे, प्रतिभा गाडेकर यांच्यासह माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षिका सुनीता कर्जुले- राऊत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर अण्णासाहेब शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.


### सायटेशन नोटीस

प्रो.फी. जमा रु
पान नं.
दि.३०.०७.२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात

चौ.अर्ज.नं ४१५- **अर्जदार**-१. शरद शिवनाथ शिरसाठ रा. वडगांव ता. शेवगांव
**सामनेवाला**
**सरकार**

सदर अर्जदार हा मौजे वडगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री शरद शिवनाथ शिरसाठ यांचा मुलगा वैष्णव शरद शिरसाठ याचा जन्म दि.१३.०९.२०२० रोजी धन्वंतरी हॉस्पीटल शेवगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार याना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलाचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार याचे मुलाचा जन्म नोंद नगरपालिका, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदनी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नांव नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्यूची नोंद नसलेबाबत दि ०६.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/ मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचा मुलाचा जन्म/मृत्यु नोंद जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने में कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत किंवा दि.२२/०८/२०२६ पुर्वी त्याने ह्या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि ह्यव लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील

आज दि. ३०/७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे

शिक्का

**सही**
**तहसिलदार शेवगाव**
**तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**


## एसआयआर मतदार पडताळणी पूर्ण

### प्रांताधिकारी व तहसीलदारांचा शिवसेनेकडून सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघातील एसआयआरअंतर्गत पहिल्या टप्प्यातील मतदार पडताळणीचे काम विहित मुदतीपूर्वी शंभर टक्के पूर्ण केल्याबद्दल प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांचा शिवसेना (शिंदे गट) श्रीरामपूर तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध कामगिरीचे शिवसेना तालुकाप्रमुख संतोष डहाळे यांनी कौतुक केले. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजेश तांबे, शरद भणगे, उपतालुकाप्रमुख शिवनाथ फोपसे, रवीशेठ गरेला, विरांत गुजराणी, किशोर बनसोडे, दशरथ गायकवाड यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी संतोष डहाळे म्हणाले की, मतदार यादी ही लोकशाही प्रक्रियेचा महत्त्वाचा आधार असून पुढील दावे, हरकती व सुनावणीच्या टप्प्यातही शिवसेना प्रशासनाला सकारात्मक सहकार्य करेल. प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी सांगितले की, निवडणूक विभागातील अधिकारी, कर्मचारी, बीएलओ आणि संबंधित सर्व घटकांच्या समन्वयातून हे काम मुदतीपूर्वी पूर्ण झाले. पुढील टप्पाही पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


## हरवले आहे

माझे दहावी मार्कशिट, बारावी मार्कशिट, डिप्लोमा फायनल मार्कशिट आणि शाळा सोडल्याचा दाखला हे पाथर्डी ते नासिक प्रवासा दरम्यान दिनांक ०५/०८/२०२६ रोजी कोठेतरी हरवले आहे सदर कागदपत्रे कोणास मिळाल्यास कृपया खालील पत्यावर किंवा पाथर्डी पोलिसांशी संपर्क साधा.

**वरद सुभाष काकडे**
मु.पो औरंगपुर ता. पाथर्डी
जि. अहिल्यानगर



## CHANGE OF NAME PUBLIC NOTICE

I hereby declare that my name "**Satish Baban Ingale**" (as recorded in my School Leaving Certificate) and "**Satish Babanrao Ingale**" (as recorded in my Aadhaar Card 6700 6929 1542 ) refer to one and the same person.

I have adopted and shall henceforth be known as "**Satish Babanrao Ingale**" for all official, legal, and personal purposes.

Address : At. Aradgaon, Tal. Rahuri, Dist. Ahilyanagar – 413705.

**Date: 06/08/2026**
**(SATISH BABANRAO INGALE)**


## म. फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त पाणलोट क्षेत्रात वृक्षारोपण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त पाणलोट क्षेत्रात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी वृक्ष लागवड हा केवळ एक दिवसीय कार्यक्रम न राहता आयुष्यभर राबवावा असा संदेश दिला. याप्रसंगी विद्यापीठातील आदर्श गाव योजनेअंतर्गत विकसित करण्यात येत असलेल्या पाणलोट क्षेत्रात आवळ्याची १०० रोपे व बेहड्याची १०० रोपांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सचिन नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. कैलास कांबळे व क्रीडा अधिकारी वैभव बारटक्के यांनी केले. या वृक्षारोपण कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.

# पान १ वरुन

## महिलेवर अत्याचार करून दगडाने ठेचून निर्घृण हत्या

ग्रामस्थांनी व्यक्त केला. आंदोलनात महिलांची उपस्थितीही मोठ्या प्रमाणात होती. सुषमा रावडे (महिला तालुकाध्यक्षा, पारनेर) यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. सुवर्णाताई धाडगे (महिला तालुकाध्यक्षा, पारनेर) आणि पुनमताई मुंगसे (युवती तालुकाध्यक्षा, पारनेर) यांनी या प्रकरणाचा जलदगतीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुपा पोलीस करत आहेत.

## फुकट योजनांपेक्षा रोजगार निर्मितीला प्राधान्य द्या

देशातील अनेक तरुण अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करूनही उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवल आणि बँकांकडून कर्ज मिळण्यात अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. आपली मुलं इंजिनिअर झाली आहेत. त्यांना उद्योग सुरू करायचा आहे; मात्र बँका तारण मागतात. तारण आणायचे कुठून? हातात पदवी असूनही उद्योग करता येत नसेल, तर त्या शिक्षणाचा उपयोग काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी देशातील वाढत्या आर्थिक विषमतेकडेही लक्ष वेधले. देशात जगणं स्वस्त झालंय आणि मरणं महाग झालंय. ही परिस्थिती का निर्माण झाली, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे, असेही खोत म्हणाले. महायुती सरकारने निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार कर्जमाफीची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगत त्यांनी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात नाराजी असल्याची कबुली दिली. मात्र आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफी हा कायमस्वरूपी उपाय नसून शेतीसाठी पायाभूत सुविधा, कृषी प्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना देणारी धोरणे राबविणे अधिक आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## मुकुंदनगरच्या दर्गा दायरा परिसरात महापालिका कर्मचाऱ्याला मारहाण : हल्लेखोर फरार

मनपा कर्मचाऱ्यांनी तात्काळ उपचारासाठी नगरच्या सिविल हॉस्पिटल येथे दाखल केले. तेथे प्राथमिक उपचारानंतर परदेशी याची प्रकृती चिंताजनक बनल्याने त्याला उपचार कामी मेक केअर हॉस्पिटल येथे अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. दरम्यान या घटनेची माहिती मिळतात परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शहर विभागाचे पोलीस उपाधीक्षक वैभव कुलबर्गे व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन परिस्थिती नियंत्रणात आणली तसेच जखमी परदेशी याची रुग्णालयात जाऊन भेट घेतली. परदेशी याची प्रकृती चिंताजनक असल्याने रुग्णालय परिसरात मोठा जमाव गोळा झाला होता. यावेळी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रुग्णालय परिसरातही पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. दरम्यान पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी विविध पथक पथके रवाना केली आहेत. रात्री उशिरा एका हल्लेखोराला ताब्यात घेतले असून इतर आरोपींच्या आलमगीर, भिंगार, मुकुंद नगर परिसरात शोध घेतला जात आहे. या घटनेची माहिती मिळतात आ. संग्राम भैय्या जगताप यांनी रुग्णालयात जाऊन जखमी परदेशी याच्या प्रकृती विषयी विचारपूस केली. यावेळी नगरसेवक दत्ता गाडळकर, विकी जगताप, आनंद लहानगे ,अजिंक्य बोरकर व इतर हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.

## पुण्यात लव्ह ट्रँगलचा थरार!

गर्लफ्रेंड आहे. तेव्हाला कळलं सागर तिसऱ्या मजल्यावर आहे. दिनेश थेट तिसऱ्या मजल्यावर गेला आणि काही क्षणांतच खोलीतून आरडाओरड ऐकायला आला. पीजीमधील कर्मचारी आणि इतर पीजीमध्ये राहणारे लोक धावत गेले तर त्यावेळी सागर गायकवाड हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. तर दिनेश सागरवर लोखंडी रॉडने वार करताना दिसून आला. दिनेशने सागरवर लोखंडी रॉडने तब्बल १३ ते १४ वार केले होते. हा हल्ला थांबवत असताना दिनेशने निकीतालाही बेदम मारहाण केल्याचे प्रत्यक्ष दर्शींनी सांगितलं. या हल्लयात सागरचा जागीच मृत्यू झाला तर निकिता गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे.

## SC-ST आरक्षणात 'क्रिमी लेयर'ला केंद्राचा विरोध; सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल

स्वीकारण्यास कायदेशीर आधार नाही. गेल्या वर्षी ११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने रामाशंकर प्रजापती व इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकांवर केंद्र व राज्य सरकारांना नोटीस बजावली होती. याचिकेत, डउ-डढ समाजातील ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी यापूर्वी घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पदे भूषविली आहेत, त्यांच्या मुलांना आरक्षणाचा लाभ देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी उप-श्रेणी निर्माण करून त्यांना शिक्षण प्रवेश व सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

## ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी रुपये वर्ग

६२२ कोटी ७४ लाख रुपये एवढ्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तसेच अन्य राष्ट्रीयकृत बँकांमधील सहा हजार ९०३ शेतकरी सभासदांना ७५ कोटी ०७ लाख २५ हजार १३९ रुपये रकमेच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्मार्ट क्लास, लॅब, रोबोटिक्सने वेधले लक्ष

## वैजापूरच्या जि. प. प्रशालेचे पालटले 'रुपडे'



शाळेच्या बदललेल्या स्वरूख्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. आगामी काळात अधिकाधिक पालकांनी व विद्याथ्यांनी विद्या शाळेला भेट देऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, पुढील शैक्षणिक वर्षात मनूर, वाकला आणि लासूरगाव येथेही अशाच धर्तीवर आधुनिक डिजिटल शाळा उभारण्यात येणार आहेत. - **एस. के. पगार, मुख्याध्यापक,**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर : दिपक बरकसे**

एकेकाळी घटत्या पटसंख्येमुळे ओळखली जाणारी वैजापूर शहरातील जिल्हा परिषद मुलींची प्रशाला आता आधुनिक सुविधांनी सज्ज झाली आहे. राज्य शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत तब्बल ८२ लाख रुपये खर्चुन शाळेचा कायापालट करण्यात आला असून, डिजिटल शिक्षण, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि कौशल्याधारित प्रशिक्षणामुळे ही शाळा खासगी संस्थांना सक्षम पर्याय ठरत असून विद्यार्थी, पालकांमध्ये या शाळेची क्रेझ निर्माण झाली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील निवडक शाळांच्या आधुनिकीकरणासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये जिल्हा परिषद मुलीच्या प्रशालेची निवड करण्यात आली आहे.

**जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये जि प मुलींच्या प्रशालेची निवड**

त्यानुसार शाळेतील तीन खोल्यांमध्ये ॲस्ट्रॉनॉमी लॅब, आयडॉल लॅब (प्रयोगशाळा) आणि इनोव्हेशन लॅब उभारण्यात आल्या आहेत. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्याध्यर्थ्यांसाठी स्मार्ट वर्गखोल्या, संगणक, प्रोजेक्टर, इंटरनेट सुविधा आणि डिजिटल शिक्षण साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमासोबत दररोज

**पटसंख्येत वाढ; पालकांचा विश्वास वाढला**

शाळेची क्षमता ५०० विद्यार्थ्यांची असून मागील वर्षी येथे केवळ ९५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. मात्र आधुनिक सुविधांमुळे यंदा विद्यार्थी संख्या १४५ वर पोहोचली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी खासगी शाळाच एकमेव पर्याय असल्याची धारणा बदलण्यास या उपक्रमाची मदत होत आहे. पालकांसाठी आशेचा किरणखासगी शाळांमधील वाढते प्रवेश शुल्क, वार्षिक फी, वाहतूक व इतर खर्चामुळे अनेक पालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत, अशा परिस्थितीत जिल्हा परिषद शाळेत अत्याधुनिक डिजिटल सुविधा, ॲस्ट्रॉनॉमी व इनोव्हेशन लॅब तसेच रोबोटिक्ससारखे प्रशिक्षण मोफत किंवा अत्यल्प खर्चात उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्य कुटुंबांसाठी ही शाळा आशेचा किरण ठरत आहे. दोन तास इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, डी आर्ट आणि रोबोटिक्स यांसारख्या व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. शाळेतील सर्व वर्गखोल्या वातानुकूलित करण्यात आल्या असून सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात १६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच्च लोकसहभागातून आधुनिक स्वच्छतागृहाची उभारणी करण्यात आली आहे.

# नोंदणीकृत सेवादातांकडूनच कृत्रिम रेतन करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच प्रजनन प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३' ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शास्त्रशुद्ध व सुरक्षित कृत्रिम रेतनासाठी केवळ या अधिनियमांतर्गत नोंदणीकृत खाजगी कृत्रिम रेतन सेवादातांकडूनच सेवा घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. राज्यात या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली असून, उत्कृष्ट दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढविणे तसेच प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना प्रतिबंध करणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. या अधिनियमानुसार राज्यातील सर्व रेतन केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंच्या गोठविलेल्या विर्यामात्रांचाच वापर करणे आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, प्राधिकरणाला तपासणी, झडती तसेच नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. विहित मानकांचे पालन न केल्यास ५० हजार रुपयांपर्यंत दंड, नोंदणीशिवाय गोजातीय प्रजनन सेवा देणे किंवा अप्रमाणित विर्याचा वापर केल्यास १ लाख रुपयांपर्यंत दंड, तर चुकीची अथवा दिशाभूल करणारी जाहिरात केल्यास सहा महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा २ लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. ॉ. किरण पाटील यांनी सर्व संबंधित संस्था व सेवा पुरवठादारांनी प्राधिकरणाकडे तातडीने नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी कृत्रिम रेतनासाठी केवळ प्रमाणित व अधिकृत विर्यामात्रांचाच वापर करावा, सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासावा आणि कोणतीही अनियमितता आढळल्यास तत्काळ संबंधित यंत्रणेकडे तक्रार नोंदवावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# थकीत ऊसबिल, रिकव्हरी चोरीवरून राजू शेट्टी आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** थकीत एफआरपीची चुकीची आकडेवारी साखर आयुक्त कार्यालयाला सादर करणाऱ्या साखर कारखान्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली. थकीत ऊसबिल आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



राज्यातील कारखान्यांनी सादर केलेली थकीत एफआरपीची आकडेवारी आणि प्रत्यक्ष स्थितीत मोठी तफावत असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. चुकीची माहिती देणाऱ्या कारखान्यांची चौकशी करून गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली. गेल्या तीन वर्षांत दोन किंवा तीन टप्प्यांत एफआरपी देणाऱ्या कारखान्यांनी विलंबाच्या कालावधीचे व्याज शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने जमा करावे, असेही त्यांनी सांगितले.

उसाचे वजन आणि रिकव्हरीमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातील सर्व वजनकाटे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ऑनलाइन जोडावेत, त्यामुळे वजनातील गैरप्रकारांना आळा बसेल, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाड्यात रिकव्हरी चोरीचे प्रमाण वाढल्याचा आरोप करत, तेथे साखर आयुक्त कार्यालयाने स्वतंत्र तपासणी यंत्रणा उभारावी, अशी मागणीही करण्यात आली.

प्रत्येक हंगामात ५०० टनांपेक्षा अधिक ऊस दाखविल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांची नावे सार्वजनिक करावीत, अशी मागणीही शेट्टी यांनी केली. बोगस नोंदी आणि वजनातील गैरप्रकार रोखण्यासाठी यामुळे पारदर्शकता वाढेल, असे त्यांनी सांगितले.साखर व उपपदार्थांच्या दरात वाढ झाल्याने कारखान्यांचा नफा वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिटन ३०० रुपयांचा दुसरा हप्ता तातडीने द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. देशात आणि राज्यात साखरेचा पुरेसा साठा असल्याने केंद्र सरकारने साखर आयात करू नये, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.सहकार मंत्र्यांच्या साखर कारखान्यानेच शेतकऱ्यांची एफआरपी दिली नसल्याचा आरोप करत शेट्टी यांनी सरकारवर टीका केली. ''सहकार मंत्रीच नियम पाळत नसतील, तर प्रशासन कायदेशीर कारवाई कोणावर करणार?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

बैठकीस ॲड. योगेश पांडे, प्रभाकर बांगर यांच्यासह साखर आयुक्त कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

# उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या 'स्टेटस को' (जैसे थे) आदेशाचे कथित उल्लंघन करून फेरफार मंजूर करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित महसूल अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी कचरू बनसोडे यांनी विभागीय आयुक्तांकडे निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनानुसार, मौजे रामराई (ता. गंगापूर) येथील गट क्रमांक ३६ मधील जमीन व्यवहाराबाबत ८ सप्टेंबर २०११ रोजी विक्री करारनामा करण्यात आला होता. त्यानंतर या जमिनीसंदर्भातील विविध फेरफार नोंदी रद्द करण्यासाठी महसूल प्रशासनाकडे अपील करण्यात आले. उपविभागीय अधिकाऱ्यांनी अर्जदाराच्या बाजूने निर्णय दिला होता. मात्र, त्याविरोधातील पुढील अपीलमध्ये अपर जिल्हाधिकारी व त्यानंतर अपर विभागीय आयुक्तांनी वेगळा निर्णय दिल्याचे निवेदनात आहे.

या आदेशाविरोधात महसूल मंत्र्यांकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल करण्यात आला. सुनावणी प्रलंबित राहिल्याने अर्जदाराने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. त्यावर न्यायालयाने २८ जुलै २०२६ रोजी संबंधित प्रकरणात 'स्टेटस को' कायम ठेवण्याचे आदेश दिले असल्याचा दावा अर्जदाराने केला आहे.

नमूद अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, न्यायालयाच्या आदेशाच्या प्रती तलाठी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी तसेच संबंधित मंडळ अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. तसेच आदेशाची प्रत व्हॉट्सॲपद्वारेही पाठविण्यात आली होती. न्यायालयीन सुनावणीदरम्यान राज्य शासनाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील उपस्थित असल्याने प्रशासनाला आदेशाची माहिती होती, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तरीदेखील, संबंधित मंडळ अधिकाऱ्यांनी अपर विभागीय आयुक्तांच्या आदेशाच्या आधारे फेरफार क्रमांक १६२१ मंजूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच शासकीय नियमांनुसार अपीलसाठी निर्धारित ६० दिवसांची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच ही कार्यवाही करण्यात आल्याने हा प्रकार उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान व अधिकारांचा गैरवापर असल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल विभागीय चौकशी करून दोषी महसूल अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी कचरू बनसोडे यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या ढिसाळ कारभाराने ग्राहक त्रस्त

**श्रीरामपूर ।** श्रीरामपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज रोडवरील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेतील ढिसाळ कारभारामुळे ग्राहकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार ग्राहकांनी केली आहे. वाढती गर्दी, अपुरी कर्मचारी व्यवस्था आणि वेळेत सेवा न मिळाल्याने ग्राहकांनी बँकेच्या कामकाजात तातडीने सुधारणा करून अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी केली आहे.

**सेवेत तातडीने सुधारणा करण्याची मागणी**

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, शाखेत मोठी गर्दी असतानाही बहुतांश वेळा केवळ एकाच खिडकीवर रोख रकमेचे व्यवहार सुरू असतात. दुसरी व तिसरी खिडकी नियमितपणे सुरू नसल्याने ग्राहकांना दीर्घकाळ रांगेत थांबावे लागते. कॅशियर नवीन असल्यामुळे रोख रकमेच्या व्यवहारात चुका होत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. अलीकडेच एका महिलेला १२ हजार रुपयांऐवजी केवळ ७ हजार रुपये देण्यात आल्याची घटना घडल्याचे ग्राहकांनी सांगितले. त्यानंतर संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात बराच वेळ गेल्याने इतर ग्राहकांनाही प्रतीक्षा करावी लागली. पासबुक अद्ययावत करण्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांकडून इतर कामे करून घेतली जात असल्याने पासबुक भरण्याचे कामही रखडत असल्याची तक्रार आहे. याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिवसभरातील इतर कामे सोडून आलेल्या ग्राहकांना बसत आहे.बँकेत पैसे जमा व काढण्यासाठी स्वतंत्र खिडक्या सुरू कराव्यात, गर्दीच्या वेळी अतिरिक्त काउंटर कार्यान्वित करावेत, पासबुक अद्ययावत करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमावा तसेच शाखेच्या कामकाजात सुधारणा करून ग्राहकाभिमुख सेवा द्यावी, अशी मागणी ग्राहकांनी बँक प्रशासनाकडे केली आहे.

# निधन वार्ता

## निवृत्ती चौधरी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** तालुक्यातील नांदुर्खी बु. येथील प्रगतशील शेतकरी निवृत्ती भागूजी चौधरी (वय ९८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व तीन मुली असा परिवार आहे . प्राचार्य अर्जुन चौधरी यांचे वडील तसेच राहाता पीपल्स नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन भाऊसाहेब माधव चौधरी यांचे चुलते तर निरोसर्जन डॉ. मुकुंद चौधरी यांचे आजोबा होत.

## पार्वतीबाई पालवे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नगर तालुक्यातील मजले चिंचोली येथील जुन्या पिढीतील पार्वतीबाई बाबाजी पालवे वय ७६ यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या मागे पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पोलिस हवालदार धर्मा पालवे यांच्या त्या मातोश्री होत्या.

## गं.भा.सरस्वती दोंड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील निपाणीवडगाव येथील कै. गं.भा.सरस्वती शामराव दोंड यांचे (वय ९२) दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी रावसाहेब दोंड व शिवाजी दोंड यांच्या त्या मातोश्री होत.

## नावात बदल

मी माझे नाव फरीदाबी शेख गुलामनबी वरुन फरीदा बाबाजान इनामदार असे बदलत आहे .ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून इतर कोणत्याही व्यक्तीशी त्यांचा संबंध नाही.
**प्रतीज्ञापत्र क्र** २६५२२४२०४१२६८१००७०६३७६
**दिनांक** ०३/०८/२०२६

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME JAYASHREE NARENDR JOSHI TO NEW NAME AS JAYASHRI NARENDRA JOSHI (AADHAR NO 7542 0392 3472) AP-KOPARGAON, TAL-KOPQRGAON, DIST-AHILYANAGAR. PIN- 423601. DATE -07/08/2026

# पिचडगावची 'मुक्ताई बारव' ठरणार ऐतिहासिक व पारमार्थिक पर्यटनाचे नवे केंद्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील पिचडगाव येथील ऐतिहासिक 'मुक्ताई बारव'च्या जीर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात आले असून, या प्रकल्पामुळे गावाच्या ऐतिहासिक व पारमार्थिक वैभवाला नव्याने उजाळा मिळत आहे. राष्ट्रीय ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कार्यरत असलेल्या सेवावर्धिनी या संस्थेने हा उपक्रम हाती घेतला असून, स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे कामाला वेग आला आहे.

पूर्वीच्या काळात पाणीपुरवठ्याचा महत्त्वाचा आधार असलेल्या बारवा आज इतिहासजमा होत असताना पिचडगावची ही प्राचीन वास्तू नव्या रूपात उभी राहत आहे. सेवावर्धिनी संस्थेचे कार्याध्यक्ष सुहास लुंकड, मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीष देगावकर, प्रसादराव देशपांडे, महाराष्ट्र बारव समिती तज्ज्ञ डॉ अरुणचंद्र पाठक, प्रमोद काळे, प्रमोदराव कुलकर्णी, आमोद काटीकर, सोमदत्त पटवर्धन, गिरीजा सिरशीकर, ऋषिकेश मोटे आदींनी पाहणी करून जीर्णोद्धाराचे नियोजन केले.

सेवावर्धिनी ही संस्था स्वतः मातृ संस्था म्हणून कार्य करत असून तिच्यासोबत सुमारे ५०० सेवाभावी संस्थांचे जाळे विणले आहे. बारव हा प्रकार केवळ भारतातच आढळतो. संस्थेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील बारवांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यापैकी सुमारे २६ बारवांचे लोकसहभागातून पुनरुज्जीवन करून त्या पुन्हा वापरात आणल्या आहेत.

बारवेमध्ये प्रवेश करण्याच्या प्रकारानुसार पिचडगावची बारव ही विजया बारव म्हणजे चार ही बाजूंनी पायऱ्या असलेली वैशिष्ट्यपूर्ण बारव आहे, पुरातन बारवांचे जलस्रोत हे जमिनीतील शाश्वत आणि निरंतर वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहावर आधारित असल्याने आजूबाजूला कितीही बोअरवेल किंवा विहिरींमधून पाण्याचा उपसा झाला तरी त्यांचे मूळ पाणीस्रोत कमी होत नसल्याचे अभ्यासातून समोर आले आहे. संस्था काम करताना लोकसहभागासाठी ग्रामस्थांनाही या उपक्रमात सक्रिय सहभागी करून घेते.

या कामासाठी पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख महंत ज्ञानेश्वर माऊली हजारे महाराज, सरपंच पोपटराव हजारे,टिल्लूभाऊ गव्हाणे,किरण महाराज डिवरे, संदीप डिवरे, बाळासाहेब गव्हाणे, शेजुळ सर, विलास शेजुळ, नवनाथ हजारे, सुभाष हजारे, आबा मुळे, सचिन राऊत यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी मोलाचे योगदान दिले आहे.

**मुक्ताई बारवची आख्यायिका**

स्थानिक परंपरेनुसार, संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सोपानदेव आणि संत मुक्ताबाई पैठणहून नेवासेकडे येत असताना या बारवेजवळ थांबले. त्या वेळी बारवेचे पाणी विषारी मानले जात होते. मुक्ताबाईंनी ते पाणी प्राशन केल्यानंतर ते शुद्ध झाल्याची आख्यायिका सांगितली जाते. त्यानंतर गावकरी व प्रवाशांनी या पाण्याचा वापर सुरू केला आणि या वास्तूला 'मुक्ताई बारव' हे नाव प्राप्त झाले.

**जीर्णोद्धाराचे वैशिष्ट्य**

बारवेतील प्रत्येक दगड सुमारे ५०० किलो वजनाचा असून, त्यावर क्रमांक देऊन तो पुन्हा मूळ जागी बसविण्याचे कौशल्यपूर्ण काम पूर्ण होत आले आहे. यासाठी कोणतेही प्रकारचे सिमेंट अथवा चुना लावला गेला नव्हता आणि आताही लावला नाही. यासाठी बारवेतील संपूर्ण पाणी उपसून दगडी रचना पूर्ववत करण्यात आली आहे. सेवावर्धिनी संस्था आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा ऐतिहासिक वारसा जतन केला आहे. व लवकरच त्याचा पुनर्वापर सुरू होईल.




सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .८ ऑगस्ट २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६ ४७० ३४४ | १-० | १९० २८० २४४ | जोड १४-२०-७३-९८-०६ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० १३९ ६७० | ३-६ | २४० २६० ६०० | जोड ३१-७३-९२-०८-६५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| - | सुटी | - | जोड सुटी |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

# शालेय क्रीडा स्पर्धांवर ऑनलाईन प्रणालीचा ब्रेक!

## नवीन पोर्टलमधील तांत्रिक अडचणींमुळे शाळा व खेळाडू नोंदणी रखडली

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील शालेय क्रीडा स्पर्धांच्या नियोजनासाठी शासनाने यंदापासून नवीन ऑनलाईन वेबसाईट सुरू केली असली, तरी त्यामधील तांत्रिक अडचणींमुळे संपूर्ण नोंदणी प्रक्रिया ठप्प झाली आहे. ऑगस्ट महिना सुरू होऊनही अनेक शाळांची नोंदणी पूर्ण झालेली नसून, खेळाडू नोंदणीसाठी आवश्यक असलेले प्रायमरी फॉर्म उपलब्ध नसल्याने जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रकच विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर जुनी 'क्लिक स्पोर्ट्स' वेबसाईट पूर्ववत सुरू ठेवण्याची मागणी अहिल्यानगर जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाने शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळा नोंदणी, खेळाडू नोंदणी, प्रायमरी फॉर्म, विविध अनुदान विषयक माहिती तसेच शासन निर्णय यामध्ये राज्यभर एकसारखेपणा राहावा, या उद्देशाने शासनाने यावर्षी नवीन ऑनलाईन पोर्टल सुरू केले आहे. मात्र प्रत्यक्षात या पोर्टलवर शाळांची नोंदणी करतानाच अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार क्रीडा शिक्षकांकडून केली जात आहे.

याशिवाय खेळाडू नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या प्रायमरी फॉर्मची प्रक्रिया अद्याप सुरू न झाल्यामुळे विद्यार्थ्यांची नोंदणीच होऊ शकत नाही. परिणामी शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन रखडले असून, हजारो विद्यार्थी स्पर्धांपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मागील अनेक वर्षांपासून शालेय क्रीडा स्पर्धांची ऑनलाईन प्रक्रिया 'क्लिक



स्पोर्ट्स' या संकेतस्थळामार्फत राबविण्यात येत होती. त्याच संकेतस्थळावर खेळाडूंची प्रमाणपत्रे उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना ती कोणत्याही वेळी सहज डाउनलोड करता येत होती. मात्र शासनाने नवीन प्रणाली सुरू केल्यानंतर 'क्लिक स्पोर्ट्स'सोबतचा करार संपुष्टात आल्याने जुने पोर्टल बंद झाले आहे. त्यामुळे अनेक वर्षांतील स्पर्धा प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध होत नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे शालेय व महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेत, ग्रेस गुण मिळविण्यासाठी, शिष्यवृत्ती, नोकरी तसेच विविध शासकीय प्रस्तावांसाठी खेळाडूंना क्रीडा प्रमाणपत्रांची आवश्यकता भासते. मात्र जुनी प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांची मोठी गैरसोय होत असल्याचे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे. नवीन पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करून शाळा व खेळाडू नोंदणीची प्रक्रिया सुरळीत करावी. तसेच नवीन प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत जुनी 'क्लिक स्पोर्ट्स' वेबसाईट सुरू ठेवून पूर्वीची सर्व प्रमाणपत्रे डाउनलोड करण्याची सुविधा कायम ठेवावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाने केली आहे.

याबाबतचे निवेदन महासंघाचे अध्यक्ष नंदकुमार शितोळे, कार्याध्यक्ष अजित वडवकर, उपाध्यक्ष बापूराव होळकर, सचिव नितीन घोलप तसेच सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, सुनील गागरे, घनश्याम सानप, तुवर पाटील, बापूराव गायकवाड, किरण चौधरी, काकासाहेब चौधरी आणि सुनील मंडलिक यांनी शासनाकडे पाठवले आहे.

# नगर-पाथर्डी मार्गावर हात दाखवा, एस.टी. बस थांबवा : उपक्रमाला प्रवाशांचा प्रतिसाद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळी मानुर :** पाथर्डी नगर पाथर्डी या रस्त्यावर हात दाखवा गाडी थांबवा योजनेअंतर्गत नगर साठी वीस वाढीव फेऱ्या सुरू झाल्या असून रस्त्यात गाडीसाठी या मार्गावर प्रतीक्षा करणारा प्रवासी आता दिसणार नाही. पाथर्डी आगाराने हा मार्ग प्रतिष्ठेची सेवा गृहीत धरून सेवा सुरू केली आहे. विभाग नियंत्रकांनी परिवहन महामंडळाच्या धोरणानुसार नव्या गाड्या स्थानिक पातळीवर वापरण्याबाबत सूचना दिल्या त्यानुसार अहिल्यानगर व शेवगाव पैठण अशा मार्गावर पाथर्डी आगारातून वाढीव फेऱ्या सुरू झाल्या आहेत.

गेल्या अनेक वर्षांची नगर मार्गाची वाढीव फेऱ्यांची प्रवाशांची मागणी पूर्ण झाली आहे. यामुळे प्रवासी संघटनेने विभाग नियंत्रकांचे आभार मानले आहेत. अहिल्यानगर अथवा पाथर्डी बस स्थानकावर गाडीसाठी आता प्रवाशाला दहा मिनिटांपेक्षा अधिक काळ प्रतीक्षा करावी लागणार नाही असे नियोजन करण्यात आले आहे. मात्र दुपारच्या वेळी दोन्ही बाजूने फेऱ्यांचा कालावधी वाढविलेला आहे. याशिवाय पुणे, मुंबई ,कल्याण, अशा भागातून स्थानिक पातळीसह मराठवाड्यात येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांची संख्या वेगळी




असेल. त्यामुळे आता या मार्गावर प्रवासी संख्या वाढणार आहे. अवैध प्रवासी वाहतुकीला अशा सेवेमुळे मोठ्या प्रमाणावर चाप बसणार असून प्रवाशांना सुरक्षित व जलद सेवा एसटी कडून मिळेल. पाथर्डी आगारातील बसेस शक्यतो चहापाण्यासाठी थांबवू नयेत, अशा सूचना स्थानिक अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या आहेत. प्रवाशाने कोठेही हात दाखवला तरी त्याला गाडीत घ्या असे धोरण असल्याने या मार्गावरील खाजगी वाहतूक स्थानिक पातळीवरून सुद्धा आता कमी झाली आहे.

याबाबत आगारप्रमुख अमित बनसोडे व वाहतूक निरीक्षक गोवर्धन दहिफळे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी नगर मार्गासाठी नव्याने तयार केलेले वेळापत्रक जारी केल्याचे सांगितले. श्रावण महिन्यानिमित्त धार्मिक स्थळांना जाण्यासाठी स्थानिक पातळीवरून ग्रुप बुकिंग झाल्यास बस उपलब्ध करून दिली जाईल. वरिष्ठांच्या परवानगीने लवकरच आदमापूर येथे बस सुरू करण्याचा प्रयत्न आहे. पंढरपूर व माहूरगड साठी वाढीव गाड्यांची मागणी विभाग नियंत्रकांच्या नजरे पुढे आणली जाईल. पूर्वीच्या तुलनेने चालक वाहकांची संख्या कमी असल्याने दैनंदिन वेळापत्रकाला अधिक धावपळ करावी लागते. त्यासाठी वाढीव कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी विभाग नियंत्रक पातळीवर करण्यात आली आहे. विभाग नियंत्रक पातळीवर अत्यंत सकारात्मक सर्वतोपरी सहकार्य मिळत असल्याने विविध फेऱ्यांच्या माध्यमातून उत्पन्न वाढीवर लक्ष केंद्रित केले आहे, त्याचे परिणाम सुद्धा चांगले दिसत आहेत. नगर पाथर्डी नगर या मार्गावर फेऱ्यांची संख्या वाढल्याने प्रवाशांमध्ये सुद्धा वाढ झाली आहे .

जुन्या बस स्थानकातील अवैध पार्किंग बाबत विचारणा केली असता गोवर्धन दहिफळे म्हणाले प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना याबाबत महामंडळाकडून पत्रव्यवहार सुरू आहे स्थानिक पोलिसांनाही आम्ही विनापरवाना गाड्या पार्किंग होत असल्याबद्दल कळविले आहे राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून गटारीचे काम पूर्ण होत नसल्याने त्या बाजूचे प्रवेशद्वार वापरात येऊ शकत नाही. शेवगाव रस्त्याकडील प्रवेश द्वार खड्ड्यांमुळे गाड्यांसाठी धोकादायक झाले आहे.

# निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये '१० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा अभियान'



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये नशामुक्त भारत अभियान व मिशन संवेदना अंतर्गत '१० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा अभियान' उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करून निरोगी, सुदृढ व सुसंस्कृत समाज निर्माण करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमासाठी प्रजापती ब्रह्माकुमारी संस्थेच्या पुष्पा दिदी, अशोक भाई आणि रमेश भाई हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी व्यसनांचे दुष्परिणाम, नैतिक मूल्यांचे महत्त्व आणि आध्यात्मिकतेच्या माध्यमातून व्यसनमुक्त जीवन कसे जगता येते, याविषयी प्रभावी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना नशामुक्त जीवनाची प्रतिज्ञा देण्यात आली.यावेळी प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनी विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून उत्तम चारित्र्य, शिस्त आणि संस्कार जोपासण्याचे आवाहन केले. त्यांनी अशा जनजागृतीपर उपक्रमांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल पवार यांनी केले .आभार श्रीमती रूपाली शेटे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा दृढ संकल्प अधिक बळकट होईल.

# श्रीगोंद्याचा सुपुत्र भारतीय वन सेवेत देशात ३१ वा

## आ. पाचपुते यांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** संघ लोकसेवा आयोगाच्या २०२६ च्या भारतीय वन सेवा परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर ३१ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन करणारे अहिल्यानगरचे सुपुत्र सुशांत उत्तम वडवकर यांचा मा. आमदार श्री. विक्रमदादा पाचपुते यांच्या हस्ते त्यांच्या संपर्क कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी सुशांत वडवकर यांचे आई-वडील तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार श्री. विक्रमदादा पाचपुते यांनी सुशांत वडवकर यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशामागील अथक परिश्रम, सातत्य आणि जिद्दीचे कौतुक केले.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी असल्याचे सांगत भारतीय वन सेवेत कार्यरत राहून पर्यावरण संवर्धन, वनसंपत्तीचे संरक्षण आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून देशसेवेत उल्लेखनीय योगदान द्यावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.सुशांत वडवकर यांनी अहिल्यानगर येथील भाऊसाहेब फिरोदिया विद्यालयातून शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मद्रास येथून यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेत पदवी तसेच डेटा सायन्स विषयातील विशेष प्रावीण्यासह पदव्युत्तर पदवी संपादन केली. शिक्षण दरम्यान त्यांना अमेरिकेतील कार्नेगी मेलॉन विद्यापीठ, पर्ड्यू विद्यापीठ तसेच जपानमधील एनयूटी येथे 'जासो' शिष्यवृत्ती अंतर्गत संशोधनाची संधी मिळाली.

# फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धा प्रवरा पब्लिक स्कूलचे वर्चस्व

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचे रंगतदार सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दिवसभर झालेल्या सामन्यांमध्ये प्रवरा पब्लिक स्कूलने अनेक गटांत दमदार कामगिरी करत एकहाती वर्चस्व गाजवले, तर आर्मी पब्लिक स्कूलनेही प्रभावी खेळाच्या जोरावर महत्त्वपूर्ण विजय मिळवले. अनेक सामन्यांमध्ये खेळाडूंनी हॅट्रिकची नोंद करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले. सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने २-० गोलने विजय मिळवला. आर्मी पब्लिक स्कूलकडून सिद्धी पोटे हिने ३३ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भावना हिने आणखी एक गोल करत संघाचा विजय




निश्चित केला. यानंतर प्रवरा पब्लिक स्कूल आणि आठरे पाटील स्कूल यांच्यातील १६ वर्षांखालील मुलींचा सामना चुरशीचा झाला. प्रवरा पब्लिक स्कूलच्या दामिनी जाधव हिने २१ व्या मिनिटाला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर संघाने उत्कृष्ट बचावात्मक खेळ करत आठरे पाटील स्कूलला एकही गोल करण्याची संधी दिली नाही आणि प्रवरा पब्लिक स्कूलने १-० गोलने विजय मिळवला. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर ७-० गोलने दणदणीत विजय मिळवला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व रोग निदान शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी

## आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू-निर्मला बाफना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आरोग्य मंदिर आहे.सध्याच्या युगात न परवडणारा औषधाचा खर्च यामुळे अनेक रुग्णांना उपचार मिळणे अवघड झाले आहे.मोफत आरोग्य शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू आहे. असे प्रतिपादन निर्मल ग्रुपच्या श्रीमती निर्मला बाफना यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त ब्लड प्रेशर डायबेटीज व इतर सर्व आजारांवर निदान चिकित्सा व साथीचे आजार व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन स्व.रमेशचंद्र बाफना व स्व. राहुल बाफना यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बाफना परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी शिबिराचे उद्घाटन श्रीमती निर्मला बाफना व बाफना परीवार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी संतोष बाफना,सौ.रूपाली बाफना, ऋषभ बाफना,सौरभ बाफना तसेच जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा,माणकचंद कटारीया,अभय गुगळे,सुभाष मुनोत,वसंत चोपडा, डॉ.आशिष भंडारी,प्रकाश छल्लाणी,शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.वसंत कटारिया, डॉ.गजेंद्र गिरी,डॉ.प्राजक्ता पारधे,डॉ. स्वप्नील शिंदे आदी उपस्थित होते.



सौ.रुपाली बाफना म्हणाले, जैन सोशल फेडरेशनने रुग्णसेवेच्या कार्यात बाफना परिवाराला सहभागी करून घेतले आहे. हे मी बाफना परिवाराचे भाग्य समजते.येथे येणाऱ्या रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी. यासाठी येथील सर्व डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ निस्वार्थपणे आरोग्य सेवा देत आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवेचे कार्य अविरतपणे सुरू आहे.येथे येणार्या रुग्णांच्या चेहऱ्यावरचे हसू कायम राहो. सर्वांचा स्नेह व सहयोग सदा राहो.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,बाफना परिवारा सारख्या दानशूर परिवारांच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे भरविले जात आहेत. स्व.रमेशशेठ बाफना यांनी प्रतिकूल परिस्थितीत ४५ वर्षांपूर्वी निर्मल डव्हर्टायझिंग हा व्यवसाय सुरू केला.बाफना परिवार हा पूर्वीपासूनच सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा प्रकल्पात ही बाफना परिवार पूर्वीपासून जोडला गेलेला आहे.जिथे कमी तिथे आम्ही याप्रमाणे बाफना परिवार नेहमीच सहकार्य करीत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात बाफना परिवारासारखे असंख्य परिवार सहभागी झाल्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलचे न भुतो न भविष्यती असे काम उभे राहिले आहे.

डॉ.प्राजक्ता पारधे म्हणाले, उत्तम आरोग्य जीवनशैली जगण्यासाठी प्रत्येकाने वेळोवेळी आरोग्याची तपासणी करणे आवश्यक आहे.कोणताही आजार होऊ नये.यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असतात.बीपी,शुगर,डायबेटीज तसेच सर्दी तसेच साथींचे आजार यासाठी रुग्णांनी काळजी घेणे आवश्यक आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले.तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले. या शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# द•ख•ल

## 'इतिहास महाराष्ट्राचा' महाअंतिम फेरी ४५० बालकलाकारांचा सहभाग

**अहिल्यानगर :** बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती, मुंबई आयोजित 'इतिहास महाराष्ट्राचा' इतिहासातील एका थोर विभूतीस दरवर्षी हा महोत्सव समर्पित केला जातो. यंदाच्या वर्षी हा महोत्सव 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' यांना समर्पित करण्यात आला असून, राज्यभरातील २२ केंद्रांवर २३०० बाल कलावंतांनी यात आपली कला सादर केली. प्राथमिक फेरी केंद्रात झालेल्या या महोत्सवाची महाअंतिम फेरी घेण्याचा बहुमान बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखेला मिळाला आहे. ही महाअंतिम फेरी रविवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत माऊली सभागृह येथे संपन्न होणार आहे. यात महाराष्ट्रभरातून ४५० बाल कलावंत सहभागी होणार आहेत. अशी माहिती बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती, मुंबई अध्यक्ष ड. नीलम शिर्के-सामंत यांनी दिली आहे. नाट्य, नृत्य, संगीत आदी कलांच्या माध्यमातून राष्ट्रीय पुरुषांची व थोर विभूतींची सखोल माहिती बालप्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी आणि बालकांना त्यातून प्रेरणा मिळावी, या प्रमुख उद्देशापोटी हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या महोत्सवात बालकलाकार नाट्य, नृत्य, गायन आणि वादनाच्या सादरीकरणातून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे प्रेरणादायी जीवनकार्य मांडत आहेत. असे अभिनेत्री तथा अध्यक्ष ड.निलम शिर्के-सामंत सांगितले. संपूर्ण महाराष्ट्रात बृहन्मुंबई, अहिल्यानगर, जळगाव, नंदुरबार, जालना, नवी मुंबई, सोलापूर, पुणे, बीड, जळगाव, कोल्हापूर, लातूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, धुळे, कल्याण, ठाणे, मंगळवेढा, सोलापूर, सातारा, इचलकरंजी आदी केंद्रांवर प्राथमिक फेऱ्या पार पडल्या. यातून निवड झालेले ४५० हून अधिक बालकलाकार आता अहिल्यानगरमधील महाअंतिम फेरीत आमनेसामने असतील. या अंतिम फेरीचे परीक्षण ख्यातनाम अभिनेते व तज्ज्ञ परीक्षक संजय हळदीकर (कोल्हापूर), प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे (मुंबई) आणि अभिनेते दिगंबर नाईक पाहणार आहेत, अशी माहिती महोत्सव प्रमुख दीपाली शेळके यांनी दिली.

## संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचा परतीचा प्रवास



**खरवडी कासार :** संत एकनाथ महाराज पैठण-पंढरपूर पालखी सोहळ्याचे खरवडी कासार येथे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. हा पालखी सोहळा परतीच्या प्रवासात आहे. शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या पैठण पंढरपूर पालखी सोहळ्यास खरवडी कासार गावाला मान आहे. संत एकनाथ महाराजांच्या पादुका नेण्यासाठी असणारी पालखी नाथ संस्थानाला खरवंडीकरांनी दिली. पूर्वी पितळ धातूची पालखी दिली होती. ही खराब झाल्यानंतर पुन्हा सिल्व्हर जर्मनची दिली होती. आता ही पालखी चांदीची करून नाथांना देण्यासाठी गावाचे प्रयत्न आहेत. संत एकनाथ महाराजांनी या गावाजवळ गाढवाला खराला पाणी पाजले म्हणून या गावाचे नाव खरवदी , असे झाले. पुढे चलन खरवडी नावाचे अपभ्रंश खरवंडी झाले. दारोदारी सडा, रांगोळी काढत पालखी सोहळ्याचे पूजन करण्यात आले. एकनाथ महाराज पालखीस खांदा देत गावातिल युवकानी जेष्ठ ग्रामस्थ व महिलानी स्वागत केले खरवंडी कासार येथिल सुरेश केळग्रंदे यांच्या परिवाराच्या वतीने आलेल्या वारकऱ्या ना महा प्रसाद देण्यात आला.

## एस आय आर मध्ये श्रीगोंदा तालुक्यात ३९,४०० मतदार वगळण्याच्या प्रक्रियेत!

**श्रीगोंदा :** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विशेष सघन पुनरिक्षण मोहिमेत श्रीगोंदा तालुक्यातील तब्बल ३९ हजार ४०० मतदारांची नावे वगळण्याच्या प्रक्रियेत आल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने मतदारांची नावे पडताळणीसाठी आल्याने तालुक्यात राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मृत, कायमस्वरूपी स्थलांतरित, दुहेरी नोंद असलेले किंवा अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या मतदारांची नावे यादीतून वगळण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे पडताळणीसाठी आल्याने या प्रक्रियेच्या अंमलबजावणीबाबत विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित होत आहेत.राजकीय पक्षांनीही या प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून, पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाणार नाही यासाठी प्रत्येकाने स्वतःचे नाव मतदार यादीत तपासण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दावा व हरकत दाखल करण्याची संधी उपलब्ध असल्याने संबंधितांनी वेळेत आवश्यक कार्यवाही करणे महत्त्वाचे ठरणार आहे.लोकशाहीचा पाया म्हणजे मताधिकार. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीत कायम राहणे ही प्रशासनाची आणि नागरिकांचीही समान जबाबदारी आहे.

## अवैध धंदेवाल्यांकडून कर्मचाऱ्यांचा वाढदिवस? : एसपींकडे चौकशीची मागणी

**श्रीगोंदा :** बेलवंडी येथे एका महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात अवैध धंद्यांशी संबंधित गुन्हे दाखल असलेल्या काही व्यक्ती उपस्थित असल्याचा आरोप समोर आल्यानंतर या प्रकरणाची तालुकाभर चर्चा सुरू झाली आहे. या घटनेमुळे पोलीस दलाच्या प्रतिमेबाबत प्रश्न उपस्थित करत नागरिकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्याकडे चौकशीची मागणी केली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कार्यक्रमात जुगार व इतर अवैध धंद्यांशी संबंधित गुन्हे दाखल असलेल्या काही व्यक्ती उपस्थित होत्या. त्यामुळे पोलीस कर्मचारी आणि अशा व्यक्तींच्या संबंधांबाबत संशय निर्माण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. याप्रकरणी नागरिकांमधून एकच सवाल उपस्थित केला जात आहे की, अवैध धंदेवाल्यांकडून पोलीस कर्मचाऱ्यांचा वाढदिवस साजरा करणे शिस्तप्रिय पोलीस खात्याला मान्य आहे का? जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाईची भूमिका घेणारे पोलीस अधीक्षक या प्रकरणात काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संदर्भात सामाजिक संघटनेमार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची आणि आरोप सत्य आढळल्यास संबंधितांवर विभागीय तसेच कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित पोलीस कर्मचारी किंवा पोलीस विभागाची अधिकृत प्रतिक्रिया वृत्त प्रसिद्ध होईपर्यंत मिळालेली नव्हती. त्यामुळे चौकशीअंती वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## दखल

### शेखर मुंदडा यांची गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती



**पुणे :** महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी शेखर मुंदडा यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा मागील कार्यकाळ ६ जुलै २०२६ रोजी पूर्ण झाला होता. ४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची पुन्हा अध्यक्षपदी नियुक्ती केली.

पुनर्नियुक्तीनंतर महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आभार मानले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नियुक्ती अधिसूचनेची प्रत देऊन मुंदडा यांचे अभिनंदन केले. यावेळी मुंदडा यांनी पुढील तीन वर्षांत 'गो-१० व्हिजन'च्या माध्यमातून महाराष्ट्र गोसेवा आयोगाला देशातील आदर्श आयोग बनविण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प व्यक्त केला. देशी गोवंशाचे संरक्षण व संवर्धन, गोशाळांचे सक्षमीकरण आणि गो-आधारित ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.पुनर्नियुक्तीबद्दल मुख्यमंत्री फडणवीस आणि पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांचे आभार मानत, ही पुनर्नियुक्ती पदापेक्षा मोठी जबाबदारी असून महाराष्ट्रातील गोसेवा चळवळीला अधिक बळ देण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार मुंदडा यांनी व्यक्त केला.

### फाकटे शाळेचे पाच विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत



**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फाकटे येथील पाच विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. यामुळे फाकटे तसेच बेट परिसरात विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.गुणवत्ता यादीत मच्छिंद्र चाटे व रामप्रकाश वाळुंज यांनी प्रत्येकी २५६ गुण, ईश्वरी बाबाजी शिंदे यांनी २४४, आयुष नागेश केदारी यांनी २३८, तर शिवप्रसाद विकास भालेकर यांनी २३६ गुण मिळवले. विशेष म्हणजे आयुष केदारी याची जवाहर नवोदय विद्यालयासाठीही निवड झाली आहे.या विद्यार्थ्यांना बाबाजी पोपट हिलाळ यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश डोके, तालुका गटशिक्षण अधिकारी डॉ. प्रितम कोकणे, मुख्याध्यापिका प्रिया काळे, केंद्रप्रमुख गणेश काळे तसेच ग्रामस्थांनी विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदन केले. फाकटे शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दिशेने शाळेने आणखी एक मानाचा टप्पा गाठल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### तांदळीतील भूमिपूजन फलकाची तोडफोड



**कवठे येमाई :** शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील तांदळी येथे मळई रस्ता विकासकामाच्या भूमिपूजनासाठी उभारण्यात आलेल्या फलकाची अज्ञात व्यक्तींनी मध्यरात्री तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

तांदळी-म्हसोबावाडी रस्त्याचे काम करणारे कंत्राटदार ऋषिकेश निंबाळकर यांनी याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. हा रस्ता शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या विकास निधीतून मंजूर झाला असून, नुकतेच या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते.

अज्ञात व्यक्तींनी भूमिपूजन फलक वाकवून त्याची तोडफोड केली. विकासकामाला गालबोट लावण्याच्या उद्देशाने हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि अन्य तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करून विकासकामांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रा. सुभाष शेटे यांनी केली आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे मंगळवारी आयोजन

**पुणे :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व वीर बाजी पासलकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार ११ ऑगस्ट रोजी आयटीआय वेल्हे, ता. राजगड, जि. पुणे येथे रोजगार मेळाव्याचे सकाळी १० वाजता आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये पुणे जिल्ह्यातील उद्योजकांनी त्यांचा सहभाग दर्शविलेला असून, त्यांच्याकडून ३५५ पेक्षा जास्त रिक्तपदे कळविण्यात आली आहेत. ही सर्व पदे हेल्पर, ट्रेनी, मशिन ऑपरेटर, सुपरवायझर, फिटर, क्वॉलिटी इन्सपेक्टर, सीएसओ फिल्ड ऑफिसर उमेदवारांसाठी असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या मनातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध होत आल्याने इच्छुक उमेदवारानी रिक्तपदांच्या अधिक माहितीसाठी या विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटला भेट देऊन मेळाव्यातील रिक्त पदांसाठी अर्ज करावेत. रिक्तपदांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk-in-Interview) जास्तीत जास्त उमेदवारांनी रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून, आपला सहभाग नोंदवावा.

# सौर सिंचनाचे महाराष्ट्र मॉडेल जागतिक पातळीवर उपयुक्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सौरऊर्जेवर आधारित कृषी सिंचनाचे महाराष्ट्र मॉडेल देशातील अन्य राज्यांसह विकसनशील राष्ट्रांसाठी उपयुक्त ठरत आहे. या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत असून रोजगारनिर्मितीलाही मदत होत आहे, असे मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.




मुंबई येथे आयोजित एआयआयबी आणि 'मित्रा'च्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र.

महावितरण, एआयआयबी आणि 'मित्रा' यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कृषी सिंचनासाठी सौरऊर्जेच्या वापरावर चर्चासत्र झाले. या वेळी लोकेश चंद्र बोलत होते.राज्यात आतापर्यंत ११ लाख सौर कृषी पंप बसविण्यात आले असून त्याचा ११ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. सुमारे ४० लाख एकर क्षेत्राला सिंचनाची सुविधा मिळाली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

मार्च २०२७ अखेर कृषी सिंचनासाठी शंभर टक्के वीजपुरवठा सौरऊर्जेतून करण्याचे महावितरणचे नियोजन आहे. देशातील एकूण सौर कृषी पंपांपैकी ६५ टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. एका महिन्यात ४५ हजार ९११ सौर पंप बसविण्याचा विक्रमही राज्याने केला आहे. सौरऊर्जेमुळे सिंचन खर्चात बचत होण्यासोबतच पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढत असून हवामान बदलाच्या परिणामांना सामोरे जाण्यास मदत होत असल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले. महाराष्ट्राचे हे मॉडेल आंतरराष्ट्रीय पातळीवर मांडण्यात आले असून इतर विकसनशील देशांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## नोंदणीकृत सेवादातांकडूनच कृत्रिम रेतन करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांचे आवाहन**

**पुणे :** राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच प्रजनन प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३' ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शास्त्रशुद्ध व सुरक्षित कृत्रिम रेतनासाठी केवळ या अधिनियमांतर्गत नोंदणीकृत खाजगी कृत्रिम रेतन सेवादातांकडूनच सेवा घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

राज्यात या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली असून, उत्कृष्ट दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढविणे तसेच प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना प्रतिबंध करणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे.

या अधिनियमानुसार राज्यातील सर्व रेतन केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंच्या गोठविलेल्या विर्यामात्रांचाच वापर करणे आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, प्राधिकरणाला तपासणी, झडती तसेच नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. विहित मानकांचे पालन न केल्यास ५० हजार रुपयांपर्यंत दंड, नोंदणीशिवाय गोजातीय प्रजनन सेवा देणे किंवा अप्रमाणित विर्याचा वापर केल्यास १ लाख रुपयांपर्यंत दंड, तर चुकीची अथवा दिशाभूल करणारी जाहिरात केल्यास सहा महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा २ लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

डॉ. किरण पाटील यांनी सर्व संबंधित संस्था व सेवा पुरवठादारांनी प्राधिकरणाकडे तातडीने नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन केले आहे.

शेतकऱ्यांनी कृत्रिम रेतनासाठी केवळ प्रमाणित व अधिकृत विर्यामात्रांचाच वापर करावा, सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासावा आणि कोणतीही अनियमितता आढळल्यास तत्काळ संबंधित यंत्रणेकडे तक्रार नोंदवावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशाची निर्मिती, अधिक दूध उत्पादन, जनावरांच्या प्रजनन कार्यक्षमतेत वाढ, पशुधनाचा दीर्घकालीन विकास तसेच दुग्ध व्यवसायातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

## दौंडमध्ये शिंदे सेनेत पदाधिकारी, युवकांचा प्रवेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** दौंड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेला पुन्हा बळ मिळाले असून, विविध ग्रामपंचायतींचे माजी पदाधिकारी, युवक आणि शेतकऱ्यांनी ६ ऑगस्ट रोजी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. चौफुला येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.



शिवसेना जिल्हाप्रमुख महेश पासलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात टाकळी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच बाळासाहेब गरदरे, कुरकुंभ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच बाबासाहेब गायकवाड, खुटबाव ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच सिंधुताई थोरात, जिरेगाव ग्रामपंचायत सदस्य बापूराव सूर्यवंशी यांच्यासह नानासाहेब थोरात, आकाश जगताप, हेमंत गाढवे, सुरज पवार, प्रवीण पवार, आदेश गाढवे, यश नाझिरकर, नितीन गाढवे, सूर्यकांत सूर्यवंशी, किरण भंडलकर, कैलास गरदडे, वसीम शेख, मोहन भोसले, अक्षय दिवेकर आदींनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी जिल्हाप्रमुख महेश पासलकर यांनी शिवसेनेची विचारधारा, जनसेवेची बांधिलकी आणि महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

## एका भ्रूण संकलनातून चार मुऱ्हा रेडकांचा जन्म

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत कार्यरत शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे येथील भ्रूण प्रत्यारोपण व शरीराबाह्य फलन प्रयोगशाळेत अत्याधुनिक प्रजनन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एका भ्रूण संकलन प्रक्रियेतून मुऱ्हा जातीच्या तीन मादी आणि एका नर अशा चार निरोगी रेडकांचा यशस्वी जन्म झाला आहे. राज्यातील म्हैस संवर्धन तसेच उच्च आनुवंशिक क्षमतेचे पशुधन निर्माण करण्याच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे.

या उपक्रमासाठी वाकड येथील स्वप्नील कलाटे यांच्या उच्च दुग्ध उत्पादनक्षम मुऱ्हा म्हशीचा दाता म्हणून वापर करण्यात आला. एका स्त्रीबीज संकलन प्रक्रियेत १७ अंडपेशी संकलित करण्यात



आल्या. त्यापैकी पाच उच्च दर्जाचे भ्रूण विकसित करून शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे येथील दाई म्हशींमध्ये प्रत्यारोपित करण्यात आले. यापैकी चार म्हशींमध्ये यशस्वी गर्भधारणा झाली. त्यातून तीन मादी आणि एक नर अशा चार निरोगी मुऱ्हा रेडकांचा जन्म झाला. या संपूर्ण प्रक्रियेत स्त्रीबीज संकलनापासून भ्रूण प्रत्यारोपणापर्यंतची सर्व तांत्रिक कामे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळातील डॉ. विष्णू जवणे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. दाई म्हशींची आरोग्य तपासणी आणि माज नियमनाची जबाबदारी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळातील डॉ. रतिकांत नवटके यांनी सांभाळली. या प्रकल्पाची अंमलबजावणी शासकीय पशुपैदास प्रक्षेत्रातील डॉ. उदय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. जन्मलेल्या रेडकांचे संगोपन आणि व्यवस्थापन शासकीय पशुपैदास प्रक्षेत्रातील डॉ. उपेंद्र गायकवाड आणि डॉ. अमोल आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. उच्च आनुवंशिक क्षमतेच्या म्हशींची जलद निर्मिती, उत्कृष्ट दुग्ध उत्पादन क्षमता असलेल्या पशुधनाचा प्रसार आणि राज्यातील दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी हे आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कमी कालावधीत उच्च आनुवंशिक क्षमतेचे पशुधन निर्माण करण्यास तसेच पशुधनाची उत्पादकता वाढविण्यास मदत होणार आहे. राज्यात या तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक विस्तार करण्यासाठी पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रीय उपक्रम राबविण्यात येत आहेत. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील सर्व शासकीय पशुपैदास प्रक्षेत्रांमध्ये उच्च वंशावळीचे विविध जातींचे वळू निर्माण करण्यासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे.

### कळसगावच्या विमल टिंगरे यांचे निधन

**पुणे :** कळसगाव येथील आदर्श माता विमल विठ्ठल टिंगरे (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे.विमल टिंगरे या ॲमिन्युशन फॅक्टरीचे कामगार नेते गणेश टिंगरे यांच्या मातोश्री तसेच आळंदी नगरपरिषद शिक्षण मंडळाचे माजी सभापती श्रीधर कुऱ्हाडे यांच्या सासूबाई होत. त्यांच्या निधनाने कळसगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## डॉ शरदचंद्र पवार कृषि महाविद्यालयाचा राष्ट्रीय ग्रीन रँकिंग मधे देशात २४ क्रमांक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**९०.२ गुणांसह गोल्ड रेटिंग चा मान!**

**बारामती :** ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित डॉक्टर शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय बारामतीला राष्ट्रीय ग्रीन हरित क्रमवारीत (National Green University Ranking-NGUR 2026) देशात चोविसावे गोल्ड रेटिंगसह स्थान मिळाले अशी माहिती ग्रीन मेंटोर संस्थेने महाविद्यालयास दिलेल्या अधिकृत पत्रात दिली आहे, तर बारामती चे हे भारतातील एकमेव खाजगी कृषि महाविद्यालय असुन महाराष्ट्रातील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने देशाच्या क्रमवारीत अठरावे स्थान मिळवले. ग्रीन मेंटोर ही भारतातील स्तरावरील नामांकित संस्था शास्वत प्रशासन, हरित परिसर, पर्यावरण व्यवस्थापन आणि हरित उपक्रमाचे मूल्यमापन करणारी मानांकन प्रक्रिया आहे. या क्रमवारीत शास्वत प्रशासन , हरित परिसर व्यवस्थापन, जैव विविधता, हवामान कृती, उर्जा कार्यक्षमता, संशोधन, व नावोप्क्रम, अभ्याक्रमातील शाशव्तता, जलसंधारण कचरा व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था आणि समाजमिभूक उपक्रम अश्या निकषावर महाविद्यालयाचे मूल्यमापन करण्यात आले. ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती ने नुकत्याच झालेल्या फूड आणि अग्रीकल्चर (एफ ए ओ) च्या जागतिक परिषदेत बारामती चा ठसा उमटवला तसेच जगामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली तसेच या यशामुळे शाश्वतता, पर्यावरण संवर्धन आणि हवामान कृती, शैक्षणिक धोरणातून महाविद्यालयाची बांधीलकी अधोरेखित झाली आहे तसेच भारताला हरित आणि हवामान प्रतिरोधक भविष्याकडे नेण्याच्या प्रयत्नात महाविद्यालय देशातील मानांकित महाविद्यालायापैकी एक ठरले आहे.

## पाथरगावचा जुना इंद्रायणी पूल वाहतुकीसाठी बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील पाथरगाव येथील जुना दगडी इंद्रायणी नदी पूल सुरक्षिततेच्या कारणास्तव वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी याबाबत आदेश दिले आहेत.

पुलावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. पुण्याकडून मुंबईकडे जाणारी अवजड वाहने यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या कि.मी. ९४ येथून वळविण्यात येत आहेत. सोमाटणे फाटा तसेच वडगाव-तळेगाव फाटा येथून ही वाहने द्रुतगती महामार्गावर वळविण्यात येणार आहेत.

मुंबईकडून पुण्याकडे येणारी अवजड वाहने खंडाळा एक्झिटवरून जुन्या महामार्गावर न आणता लोणावळा-कुसगाव टोलनाका, कि.मी. ५५ येथून द्रुतगती महामार्गावर वळविण्यात येत आहेत.नवीन पुलावरून दुचाकी, तीनचाकी आणि हलकी चारचाकी वाहने सुरू ठेवण्यात आली आहेत. मुंबई आणि पुणे या दोन्ही दिशांकडील अवजड मालवाहू वाहनांची वाहतूक द्रुतगती महामार्गावरून वळविण्यात आली आहे.

## थकीत ऊसबिल, रिकव्हरी चोरीवरून राजू शेट्टी आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** थकीत एफआरपीची चुकीची आकडेवारी साखर आयुक्त कार्यालयाला सादर करणाऱ्या साखर कारखान्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली. थकीत ऊसबिल आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

राज्यातील कारखान्यांनी सादर केलेली थकीत एफआरपीची आकडेवारी आणि प्रत्यक्ष स्थितीत मोठी तफावत असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. चुकीची माहिती देणाऱ्या कारखान्यांची चौकशी करून गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली. गेल्या तीन वर्षांत



पुण्यात साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी.

दोन किंवा तीन टप्प्यांत एफआरपी देणाऱ्या कारखान्यांनी विलंबाच्या कालावधीचे व्याज शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने जमा करावे, असेही त्यांनी सांगितले. उसाचे वजन आणि रिकव्हरीमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातील सर्व वजनकाटे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ऑनलाइन जोडावेत, त्यामुळे वजनातील गैरप्रकारांना आळा बसेल, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाड्यात रिकव्हरी चोरीचे प्रमाण वाढल्याचा आरोप करत, तेथे साखर आयुक्त कार्यालयाने स्वतंत्र तपासणी यंत्रणा उभारावी, अशी मागणीही करण्यात आली.

प्रत्येक हंगामात ५०० टनांपेक्षा अधिक ऊस दाखविल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांची नावे सार्वजनिक करावीत, अशी मागणीही शेट्टी यांनी केली. बोगस नोंदी आणि वजनातील गैरप्रकार रोखण्यासाठी यामुळे पारदर्शकता वाढेल, असे त्यांनी सांगितले.

साखर व उपपदार्थांच्या दरात वाढ झाल्याने कारखान्यांचा नफा वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिटन ३०० रुपयांचा दुसरा हप्ता तातडीने द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. देशात आणि राज्यात साखरेचा पुरेसा साठा असल्याने केंद्र सरकारने साखर आयात करू नये, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

सहकार मंत्र्यांच्या साखर कारखान्यानेच शेतकऱ्यांची एफआरपी दिली नसल्याचा आरोप करत शेट्टी यांनी सरकारवर टीका केली.

"सहकार मंत्रीच नियम पाळत नसतील, तर प्रशासन कायदेशीर कारवाई कोणावर करणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. बैठकीस ॲड. योगेश पांडे, प्रभाकर बांगर यांच्यासह साखर आयुक्त कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

द • ख • ल

## पालकमंत्री ना. विखे पाटलांचा ९ ऑगस्टला पारनेर दौरा

**पारनेर :** अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी पारनेर तालुक्यात महत्त्वपूर्ण दौरा आयोजित करण्यात आला असून, या दौऱ्यामुळे तालुक्यातील विकासकामांना नवी गती मिळणार असल्याचा विश्वास पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला आहे.



तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी या दौऱ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. या दौऱ्यादरम्यान दुपारी २.०० वाजता श्री गणेश मंगल कार्यालय, पारनेर येथे एस.आय.आर. संदर्भातील शासकीय आढावा बैठक, ३.०० वाजता पारनेर येथे त्याच ठिकाणी टंचाईबाबत आढावा बैठक, तसेच सायंकाळी ४.०० वाजता गांजी भोयरे ते पांढरे वस्ती रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे १४२.३९ लक्ष कामाचे भूमिपूजन आणि सायंकाळी ५.०० वाजता कुकडी डावा कालव्याच्या उर्वरीत दुरुस्ती करणे १६७.६६ कोटी कामांचे भूमिपूजन पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. याबाबत आमदार काशिनाथ दाते म्हणाले, पारनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दौऱ्यातून अनेक महत्त्वाच्या विकासकामांना चालना मिळणार असून, भविष्यातही तालुक्याच्या विकासासाठी आवश्यक निधी व योजना उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. हा दौरा पारनेरच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. यावेळी आ. दाते यांनी महायुतीचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहून विकासकामांचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले.

## राष्ट्रवादी दक्षिण जिल्हाध्यक्षपदी सिताराम काकडे यांची निवड

**नगर तालुका :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्षपदी प्रा.सीताराम काकडे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना प्रदेशाध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री आमदार शशिकांत शिंदे यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे. प्रा.सीताराम काकडे



गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय असून जिल्हा कार्यकारिणी सदस्य,जिल्हा सरचिटणीस,जिल्हा उपाध्यक्ष, बूथ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष अशा विविध पदावर काम केलेले असून सध्या ते पक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते. शिव-शाहू -फुले- आंबेडकर यांची पुरोगामी विचारधारा जपत असलेल्या प्रा. काकडे यांची शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी झालेली निवड ही सामाजिक जाणीवे च्या भावनेतून काम करणाऱ्या एका प्रामाणिक कार्यकर्त्यासाठी मोठी संधी असल्याची भावना खासदार डॉ.निलेश लंके यांनी केली. विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सतत कार्यरत राहिलेला असून,पक्षाच्या या पदाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व संघटना वाढविण्यासाठी करणार असल्याचे प्रा.काकडे यांनी यावेळी सांगितले. तसेच पक्ष नेतृत्वाने माझ्यावर मोठा विश्वास दाखवून जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष,संसद रत्न खासदार सुप्रियाताई सुळे,प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे,नगर दक्षिणचे खासदार डॉ. निलेश लंके,आमदार व पक्षाचे राज्य सरचिटणीस रोहित पवार यांचे आभारही प्रा.काकडे यांनी मानले आहेत.

## मंगल भक्तसेवा मंडळाची शैक्षणिक मदत अमुल्य : बाळासाहेब निवडुंगे



**टाकळी ढोकेश्वर :** समाजात अनेक गरजू आणि होतकरू विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विदयार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणाऱ्या सेवाभावी संस्थापैकी मंगल भक्त सेवा मंडळ या मंडळाचा शिक्षण कार्यातील मदत अमुल्य असल्याचे प्रतिपादन ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले. श्री ढोकेश्वर विद्यार्थी वसतिगृहातील शंभर गरीब, गरजू,हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना तसेच बालगृहातील विदयार्थ्यांना शालेय दप्तर व वहयांचे वाटप करण्यात आले त्या प्रसंगी बाळासाहेब निवडुंगे बोलत होते. यावेळी रविंद्र मते,निलम खिलारी,वैशाली गायखे, कल्पना जाधव,सुमन वाळुंज,प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे,सोनल रोहकले,निलेश पाचर्णे,नारायण शेळके, श्रीरंग धामणे,संदीप खिलारी,मिनाक्षी पवार,विष्णू भद्रे, सोनाली माळवदे,शिरीष राऊत,पवन कुटे,भाऊसाहेब बांबेरे,नारायण हरेल,अमोल गोरे,सुनिता घोडके आदी इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले तर आभार अतुल सैद यांनी मानले.

## कर्जमाफी योजनेत केवायसीच्या अडचणी असल्याने पर्यायी व्यवस्था करा : वडते

**हातगाव :** राज्य शासनाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने राज्यातील शेतकऱ्यांचे २ लाखापर्यंतचे कर्ज माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून या निर्णयामध्ये जो शेतकरी कर्जमाफीमध्ये बसला आहे.त्या शेतकऱ्यांची केवायसी करण्याचे आदेश



दिले असले तरी शेतकऱ्यांना सेतू केंद्रामध्ये जाऊन केवायसी करताना अनेक अडचणी येत असून त्यामध्ये पर्यायी व्यवस्था करावी अशी प्रमुख मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे विमुक्त जाती विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय वडते यांनी शेवगावचे सहाय्यक यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात म्हटले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शेतकऱ्यासाठी सुरू केलेली २ लाखापर्यंतची कर्जमाफी योजना अत्यंत उपयुक्त आहे. मात्र त्यासाठी शेतकऱ्यांनी जवळच्या सेतू केंद्रात जाऊन केवायसी करण्याचे आदेश दिलेले असून ही केवायसी करताना शेतकऱ्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत असून त्यामध्ये बदल करून शेतकऱ्यांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करत वडते यांनी स्वतःच्या कर्ज माफीबाबत केवायशीचा उल्लेख केला असून त्यांनी म्हटले आहे की, मी ज्या वेळी सेतू केंद्रात गेलो त्या वेळी त्या ठिकाणी माझ्या हाताच्या बोटाचे ठसे उमटत नसून याच विषयासाठी आधार केंद्रांत अपडेट साठी गेलो असता तेथेही माझ्या हाताच्या बोटाची २० टक्के बायोमेट्रिक जास्त दिसत असल्याने मला अडचणी येत आहेत. त्यामुळे माझ्यासारख्या इतरही असंख्य शेतकऱ्यांच्या अशाच प्रकारच्या अनेक निर्माण होत असल्याने या मध्ये पर्यायी व्यवस्था करावी जेणेकरून कोणताही शेतकरी या मधून वंचित राहणार नाही असेही वडते यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# ठाकूर निमगावाची वेस धोकादायक स्थितीत!

## ग्रामस्थांची पंचायत समितीकडे दुरूस्तीची मागणी

सुरेश पाटील
राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** मौजे ठाकूर निमगाव येथील मुख्य प्रवेशद्वारावरील जुनी गाववेस (कमान) अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करत अॅड. लक्ष्मण पांडुरंग मडके व साईनाथ पंढरीनाथ कातकडे यांनी पंचायत समिती, शेवगाव येथे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. या निवेदनाची पंचायत समितीकडून रीतसर पोहोचही घेण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर गाववेसीच्या वरच्या भागात पूर्वी ग्रामपंचायत कार्यालय कार्यरत होते. सध्या या इमारतीच्या भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे गेले असून संपूर्ण



बांधकाम अत्यंत कमकुवत झाले आहे. गावातील मुख्य रहदारीचा रस्ता याच कमानीखालून जात असल्याने नागरिक, शालेय विद्यार्थी, दुचाकी-चारचाकी वाहने तसेच शेतीची वाहने मोठ्या प्रमाणात या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे कोणत्याही क्षणी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनासोबत जोडलेल्या छायाचित्रांमधून गाववेसीची दयनीय अवस्था स्पष्ट दिसून येत असल्याचे अर्जदारांनी नमूद केले आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही रचना कोसळल्यास मोठी जीवित व वित्तहानी होऊ शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

अर्जदारांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे गाववेसीची तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करून सक्षम अभियंत्यामार्फत संरचनात्मक परीक्षण करण्याची मागणी केली आहे. तसेच दुरुस्ती शक्य असल्यास तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा जीर्ण गाववेसचे निर्लेखन करून त्याच ठिकाणी सुरक्षित व मजबूत नवीन गाववेस उभारण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. तोपर्यंत कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून आवश्यक सुरक्षा उपाययोजना त्वरित राबविण्याची विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.

दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ती होण्यापूर्वीच प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका अर्जदार अॅड. लक्ष्मण पांडुरंग मडके व साईनाथ पंढरीनाथ कातकडे यांनी मांडली आहे. आता या गंभीर विषयावर पंचायत समिती व संबंधित विभाग किती तत्परतेने कार्यवाही करतात, याकडे ठाकूर निमगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## मोहोज रस्ता डांबरीकरणाची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** करंजी ते मोहोज हा रस्ता अत्यंत खराब झाला असून गेल्या काही वर्षापासून दुरुस्त झालेला नाही. त्यामुळे या रस्त्याने ये-जा करणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी अडचण होत असून हा रस्ता तातडीने डांबरीकरण करावा अशी मागणी नितीन खांदवे, राहुल अकोलकर , भगवान मुखेकर यांसह या परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

याबाबत सविस्तर असे की करंजी , कौडगाव व मोहोज असा रस्ता जातो.मात्र या रस्त्याला जिल्हा परिषदेकडून रस्ता क्रमांक तथा नंबरच मिळालेला नाही. अनेक वेळा ग्रामपंचायतकडे मागणी करूनही ग्रामपंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले. या रस्त्याला नंबरच नाही त्यामुळे हा रस्ता करण्यासाठी निधी देण्यात अडथळा येत असल्याचे अधिकारी सांगतात. मात्र हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून वहिवाटीचा व रुंद असतानाही याला नंबर का मिळाला नाही असा प्रश्न ग्रामस्थ स्थानिक पदाधिकाऱ्यांना विचारत आहेत. याबाबत नितीन खांदवे म्हणाले



की फक्त मते मिळवण्यासाठीच करंजीतील सत्ताधारी व विरोधक आमच्याकडे येतात.त्यानंतर मात्र कोणत्याच गोष्टीसाठी लक्ष देत नाहीत. आलटून पालटून सत्तेवर आलेल्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी या रस्त्यासाठी नंबर मिळावा म्हणून पाठपुरावा करण्यात मुद्दामहून दुर्लक्ष केले. आगामी काळात या रस्त्याला नंबर मिळवून तसेच तातडीने डांबरीकरण करण्यासाठी लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे सांगितले. यावेळी राहुल अकोलकर, अजित अकोलकर, नाना मुटकुळे , अतुल मुटकुळे,नवनाथ मुटकुळे, संदिप अकोलकर, संतोष अकोलकर,वसंत मुखेकर, नितीन खांदवे, नामदेव अकोलकर,राजू अकोलकर, ऋषिकेश अकोलकर,भगवान मुखेकर, सोमनाथ मुटकुळे,संजय अकोलकर यांनी केली आहे.

## नान्नजला प्रलंबित प्रश्नांसाठी शहाजी राजेभोसले यांचे आमरण उपोषण सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथील काँग्रेसचे ता.अध्यक्ष शहाजी राजेभोसले यांचे नान्नज ला नवीन बसस्थानक उभारण्यात यावे व राष्ट्रीयीकृत बँक शाखेची स्थापना करण्यात यावी या सह ७ विविध प्रकारच्या मागण्या साठी नान्नज बाजारतळ येथे आमरण उपोषण सुरू झाले आहे

नान्नज शहर हे जामखेड तालुक्यातील मोठी बाजार पेठ असुन येथे सुमारे ७ ते ८ हजार लोकसंख्येचे महत्त्वाचे गाव असून परिसरातील १२ ते १३ गावे शैक्षणिक, वैद्यकीय व दैनंदिन व्यवहारासाठी नान्नजवर पूर्णपणे अवलंबून आहेत. मात्र, नागरी सुविधांचा प्रचंड अभाव व रस्त्यांची झालेली दुरवस्था यांमुळे संपूर्ण परिसराचा विकास खुंटला आहे. त्यामुळे नान्नज येथे




पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह व आसनव्यवस्था असलेले सुसज्ज बसस्थानक उभारण्यात यावे, तसेच शेतकरी, लहान व्यापारी, वृद्ध व तरुणांच्या सोयीसाठी 'स्टेट बँक ऑफ इंडिया' किंवा 'बँक ऑफ महाराष्ट्र'सारख्या राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करण्यात यावी, अशा मागण्या साठी काँग्रेस चे ता.अध्यक्ष शहाजीराजे भोसले हे नान्नजला आज पासून दि. ७/८/२०२६ रोजी पासुन बाजारतळ येथे उपोषणास बसले आहेत उपोषणस्थळी अजून एकही प्रशासनाचे अधिकारी आले नाही व भेट दिली नाही.

शहाजीराजे भोसले यांच्या मागण्या शासनाने मान्यता केल्या नाही तर नान्नज गाव बंद करून नान्नज मध्ये जामखेड करमाळा रोड वर रस्तारोको आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे प्रशासनाने या रास्त मागण्यांची वेळेत दखल घ्यावी हे आमरण उपोषण अधिक तीव्र स्वरूपात छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे. या वेळी नान्नज ग्रामस्थांनी उपोषणकर्त्यांला पाठींबा दिला आहे.

## हशु आडवाणी विद्यालयात डॉ. जयश्री मुळेंचे किशोरवयीन मुलींना समुपदेशन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** पार्थ वेल्फेअर फाउंडेशन आणि हशु आडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राशीन यांच्या संयुक्त विद्यमाने किशोरवयीन मुलींसाठी कळी उमलताना या विषयावर विशेष समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका डॉ. जयश्री मुळे यांनी किशोरवयीन मुलींना संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता, शारीरिक आरोग्य तसेच किशोरावस्थेत होणारे शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदल याविषयी अत्यंत सविस्तर व समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले. त्यांनी मुलींना आत्मविश्वासाने या बदलांना सामोरे जाण्याचे आवाहन करत आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्वही पटवून दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज विकास संस्थेच्या निरीक्षिका श्रीमती आसमा काझी मॅडम होत्या, तर ऋतुजा पडवळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यक्षपदाची निवड श्रीमती मनीषा खराडे मॅडम यांनी केली, तर अनुमोदन कु. गौरी पंडित मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती ललिता कांबळे मॅडम यांनी करून किशोरवयीन मुलींना समुपदेशनाची आवश्यकता आणि त्याचे




सामाजिक महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती मनीषा खराडे मॅडम यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पार्थ फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. शांताराम पडवळकर, ज्येष्ठ शिक्षक श्री. आजिनाथ शिंदे सर यांच्या विशेष पाठपुराव्याबरोबरच श्रीमती मयुरी शाह, श्रीमती अस्मिता काळे, कु. प्रांजल साळवे तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. हा कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य श्री. राजेंद्र नष्टे सर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या या मार्गदर्शन कार्यक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, अशा उपक्रमांमुळे किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## बेलवंडी पोलीस ठाण्यास गुरुकुल विभागाची शैक्षणिक भेट



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** विश्वास व आदराची भावना वाढीस लागावी, या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, बेलवंडी बु. येथील गुरुकुल विभागाच्या सहशालेय उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि. ७) बेलवंडी पोलीस ठाण्यास शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्याचे कामकाज, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी तसेच पोलीस दलातील शस्त्रास्त्रांची प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली.

सहा पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या दैनंदिन कामकाजाची सविस्तर माहिती दिली. नागरिकांच्या तक्रारींची नोंद, प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्याची प्रक्रिया, गुन्ह्यांचा तपास तसेच समाजात शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस यंत्रणा चोवीस तास कशाप्रकारे कार्यरत असते, हे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले.

यावेळी महिला, बालक व सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांकांची माहिती देत त्यांचा योग्य वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. क्षेत्रभेटीदरम्यान पोलीस दलात वापरल्या जाणाऱ्या रायफल, बंदूक आदी शस्त्रास्त्रांचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

## काकडे व पुरनाळे कुटुंबाने स्व:हितापेक्षा समाजाला प्राधान्य दिले : आ. कोल्हे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** सार्वजनिक कामे, पाणी चळवळ आणि समाजसेवेसह शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान देणारे कुटुंब म्हणून काकडे कुटुंबाची ओळख आहे. काकडे व पुरनाळे कुटुंबाने स्वहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिल्याचा इतिहास चिरकाल स्मरणात राहणारा आहे. पूर्वजांनी प्रतिकूल परिस्थितीला ज्या धैर्याने सामोरे जाऊन समाजकारणाचा आदर्श निर्माण केला, त्यातून आजच्या पिढीला प्रेरणा मिळते. राज्य व राष्ट्राचे भविष्य घडवायचे असेल, तर इतिहासाची पाने उलगडून पाहण्याची गरज आहे. आजची 'जनरेशन-झेड' राजकारणापासून दूर गेलेली नसून ती अधिक जागरूक आणि सतर्क झाली आहे. त्यामुळे या पिढीला योग्य दिशा देणे आवश्यक असून तरुणाईने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून शालेय जीवनापासूनच कौशल्यविकासावर भर द्यावा, असे प्रतिपादन विधान परिषदेचे



सदस्य आमदार विवेक कोल्हे यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शेवगाव स्थित गणेशनगर येथील कॅम्पसचे 'डॉ. त्रिंबकराव पुरनाळे कॅम्पस असे नामकरण आणि 'युवाशक्ती करंडक' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार कोल्हे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष अॅड.शिवाजीराव काकडे, हर्षदा काकडे, पृथ्वीसिंह काकडे, जगन्नाथ गावडे, भगूरचे सरपंच वैभव पुरनाळे, रामजी पोटफोडे, प्रमोद तांबे, लहू जायभाये आदि उपस्थित होते. उपस्थित युवकांना मार्गदर्शन करताना आमदार कोल्हे म्हणाले, आपल्याकडे असलेल्या वेळेचा सदुपयोग करणे आवश्यक आहे. जगात सर्वाधिक स्क्रीन टाइम घालवणारा देश म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. युनिसेफच्या अहवालानुसार देशातील सुमारे ३८ टक्के विद्यार्थी ताण-तणावाखाली आहेत. त्यामुळे स्व-विकासासाठी मोबाईलचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता च्या युगात प्रत्येकाने योग्य आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वतःचे जीवन सक्षमपणे घडवावे.

दिवंगत माजी मंत्री शंकरराव कोल्हे आणि डॉ. त्रिंबकराव पुरनाळे यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध होते. या दोन्ही परिवारांना समाजकारण, राजकारण आणि लोकचळवळीचा समृद्ध वारसा लाभला आहे. तरुण एकत्र आले की परिवर्तन घडते, हे इतिहासाने सिद्ध केले आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी युवकांचे संघटन निर्माण होणे गरजेचे आहे. त्याच भावनेतून तालुक्यातील युवकांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांचे निराकरण करण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत आहे. युवकांमध्ये क्रीडाभावना वाढावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आल्याचे आयोजक कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे यांनी स्पष्ट केले.

# श्रीगोंद्याच्या दोन सुपुत्रांची मंत्रालयात दमदार भरारी!

## संभाजी जाधव, अर्जुन लांडगे यांची अवर सचिवपदी निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी कोठारचे संभाजी जाधव आणि श्रीगोंदा येथील अर्जुन लांडगे या दोन सुपुत्रांनी भारतीय नौदलापासून मंत्रालयापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास करत तालुक्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले आहे. नौदलात एकाच वेळी सेवेत दाखल झालेले हे दोघे आज महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयातही एकत्र कार्यरत असून, त्यांच्या यशाची सर्वत्र चर्चा होत आहे.

संभाजी जाधव यांनी बेलवंडी कोठार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून शिक्षणाची सुरुवात केली. त्यानंतर श्रीगोंद्यातील महादजी शिंदे विद्यालयात शिक्षण घेत असतानाच जुलै १९९१ मध्ये भारतीय नौदलात प्रवेश केला. १५ वर्षांच्या सैनिकी सेवेदरम्यान त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. २००६ मध्ये नौदलातून सेवामुक्त झाल्यानंतर नागरी सेवेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.साडेचार वर्षांच्या संघर्षानंतर २००८ मध्ये मंत्रालयात सहायक कक्ष





अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्यांनी अवर सचिव (वर्ग-१) या प्रतिष्ठेच्या पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या पदोन्नती नंतर राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे संभाजी जाधव यांची नियुक्ती झाली आहे या संपूर्ण प्रवासात अर्जुन लांडगे यांचाही सहप्रवास कायम राहिला.

अर्जुन लांडगे यांचे प्राथमिक शिक्षण श्रीगोंदा येथे पार पडले जुलै १९९० मध्ये भारतीय नौदलात प्रवेश केला. १५ वर्षांच्या सैनिकी सेवेदरम्यान त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. २००५ मध्ये नौदलातून सेवामुक्त झाल्यानंतर नागरी सेवेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. साडेचार वर्षांच्या संघर्षानंतर २००८ मध्ये मंत्रालयात सहायक कक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्यांनी अवर सचिव (वर्ग-१) या प्रतिष्ठेच्या पदापर्यंत मजल मारली आज ते अवर सचिव म्हणून नगर विकास विभागात रुजू झाले आहेत नौदलातील सहकारी असलेले हे दोघे आज मंत्रालयातही एकत्र कार्यरत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणेचे दीपस्तंभ ठरत आहेत.आपल्या यशामागे आई-वडील, गुरुजन, कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच नौदल आणि मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी व सहकाऱ्यांचे मोठे योगदान असल्याची कृतज्ञ भावना संभाजी जाधव व अर्जुन लांडगे यांनी व्यक्त केली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.८ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## दारू तस्करीप्रकरणी एकास अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : शनी शिंगणापूर पोलिसांनी अवैध गावठी हातभट्टी दारूची वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध कारवाई करून ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अर्जुन भिमराज पवार (वय ४०, रा.बऱ्हाणपूर शिवार, ता. नेवासा) असे त्याचे नाव आहे.६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे १.०५ वाजण्याच्या सुमारास शिंगणापूर-सोनई मार्गावर ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून १० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू तसेच एमएच-१७-डीएफ-१९५८ क्रमांकाची मोटारसायकल असा एकूण ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस कॉस्टेबल संजय हिवाळे यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार शिंगणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२८/२०२६ दाखल करण्यात आला असून, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) व ८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शिंगणापूर पोलीस करत आहेत.

## समता पतसंस्था बोगस खाते प्रकरण

# आरोपी अशोक खरात व मिलींद बनकरला न्यायालयीन कोठडी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित समता नागरी सहकारी पतसंस्थेतील कथित बोगस खाते आणि आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला आता मोठे वळण मिळाले आहे. या घोटाळ्यातील मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या अशोक खरात व समता पतसंस्था राहाता शाखेचा मॅनेजर मिलींद बनकर याला पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर राहाता न्यायालयात हजर करण्यात आले होते.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपीला न्यायालयीन कोठडी (मॅजिस्ट्रेट कस्टडी) सुनावली असून, त्याची रवानगी नाशिक मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे. समता पतसंस्थेत बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस खाती उघडून ६३ लाख रुपयांचे आर्थिक गैरव्यवहार केल्याचा ठपका आरोपी अशोक खरात याच्यावर ठेवण्यात आला आहे. तसेच सदर बोगस खाते उघडणे कामी समताचा मॅनेजर मिलींद बनकर याचा सहभाग आढळून आल्याने. गुन्हा दाखल झाल्यानंतर एसआयटी ने त्याला अटक केली होती.



### नाशिक कारागृहात रवानगी

घोटाळ्याचे मूळ शोधण्यासाठी आणि आरोपीकडून महत्त्वपूर्ण माहिती हस्तगत करण्यासाठी न्यायालयाने त्याला यापूर्वी पोलीस कोठडी सुनावली होती.

ही मुदत संपल्याने पोलिसांनी त्याला पुन्हा कडक बंदोबस्तात राहता न्यायालयात हजर केले. तपास अधिकाऱ्यांनी आतापर्यंत झालेल्या तपासाचा अहवाल न्यायालयासमोर सादर केला. त्यानंतर न्यायालयाने आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्याचे आदेश दिले.

### काय आहे नेमके प्रकरण?

समता पतसंस्थेतील कथित बोगस खात्यांचे हे प्रकरण गेल्या काही काळापासून संपूर्ण जिल्ह्यात प्रचंड गाजत आहे. पतसंस्थेच्या ५७ जणांचे नावे १०० खात्यांमध्ये संशयास्पद आणि बोगस व्यवहार झाल्याचे फिर्यादी परब यांनी गुन्हा दाखल केला होता . कोणतीही अधिकृत पडताळणी न करता, खोटी नावे आणि बनावट कागदपत्रांचा वापर करून ही खाती चालवली जात होती. या खात्यांद्वारे पतसंस्थेचा पैसा अनधिकृतपणे वळवण्यात आल्याचा संशय आहे. या तक्रारीवरून स्थानिक पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे फिरवली होती. आज त्यांना दोघांना शिर्डी, राहाता चे गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी मिळाल्याने शिर्डी एसआयटी चा तपास पुर्ण झाला आहे.

## गोदावरीच्या रौद्ररूपाने वाहून गेला मार्ग १७ गावांतील नागरिकांचे हाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर** : नाशिक जिल्ह्यात अलीकडेच झालेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला मोठा पूर आला होता. नदीच्या वाढलेल्या प्रवाहामुळे वैजापूर तालुक्यातील बाजाठाण-कमलपूर मार्गावरील कोल्हापुरी बंधाऱ्याचा रस्ता मोठ्या प्रमाणात वाहून गेला. परिणामी या मार्गावरील सुमारे १७ गावांचा संपर्क तुटला होता. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शैक्षणिक, कृषी आणि आर्थिक व्यवहारांवरही त्याचा विपरीत परिणाम झाला होता. ग्रामीणांची अडचण लक्षात घेऊन आमदार रमेश बोरणारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी पुढाकार घेत नुकसानग्रस्त मार्ग पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. जनसहभाग आणि सामूहिक श्रमदानाच्या माध्यमातून अवघ्या काही दिवसांत युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले.

स्थानिकांच्या अथक परिश्रमामुळे कोल्हापुरी बंधाऱ्यावरील मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून त्यामुळे परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या दुरुस्तीच्या कामात सोमनाथ भराडे, अब्दुल शेख, पप्पू चौधरी, रामकिसन मेघळे, शैलेश मेघळे, भारत चौधरी आणि अमोल घोडे यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच गावातील अनेक नागरिकांनी श्रमदान करून आणि आवश्यक सहकार्य देऊन हे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. मार्ग पुन्हा सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करणे सोपे झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात येणारा अडथळा दूर झाला असून व्यापारी आणि नागरिकांचाही दैनंदिन प्रवास सुरळीत झाला आहे. या जनसहभागातून साकारलेल्या कामाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले. संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांनी एकजुटीने केलेल्या या प्रयत्नामुळे विकासकामांसाठी लोकसहभाग किती महत्त्वाचा आहे, याचे उत्तम उदाहरण या कामातून पाहायला मिळाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## विवाहितेचा विनयभंग; धमकीप्रकरणी तरुणावर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील एका गावात २२ वर्षीय विवाहित महिलेचा हात धरून विनयभंग केल्याप्रकरणी तसेच शरीरसुखाची मागणी करून धमकी दिल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा पीडित महिलेच्या पतीचा मित्र असल्याने त्याचे तिच्या घरी येणे-जाणे होते. सुमारे महिनाभरापूर्वी त्याने महिलेचा मोबाईल क्रमांक घेतला होता व वारंवार फोन करून संपर्क साधत होता. दि. २८ जुलै रोजी रात्री गावात बाळूमामा देवाची पालखी आली असताना पीडिता दर्शनासाठी गेली होती. यावेळी आरोपीने तिला बाजूला बोलावून प्रेम व्यक्त करत तिच्यासोबत संबंध ठेवण्याची मागणी केली. महिलेने नकार दिल्यानंतर आरोपीने तिचा हात धरून विनयभंग केला.

तसेच माझ्याशी संबंध ठेवले नाहीत तर तुझ्या पतीला आपल्या फोनवरील संभाषणाबाबत सांगीन, अशी धमकी देत शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घडलेला प्रकार महिलेने पतीला सांगितल्यानंतर तिने राहुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार विशाल संजय गव्हाणे (रा. वडनेर, हारदे वस्ती, ता. राहुरी) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५(२), ३५१(२) व ३५२ अन्वये विनयभंग, धमकी व शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार रामनाथ सानप करीत आहेत.

## रिपरिप पावसाने शेतकऱ्यावर कोसळले संकट विहीर खचून १५ लाखांचे नुकसान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील पानोडी येथे सततच्या रिपरिप पावसामुळे शेतकरी महादू आनंदा खेडकर यांची ६५ फूट खोल विहीर अचानक खचल्याने सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. विहिरीसह त्यावर अवलंबून असलेला मत्स्यपालन व्यवसायही उद्ध्वस्त झाल्याने खेडकर कुटुंब मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहे. गट क्रमांक ५२३/४/२ मधील ही विहीर मूळची १९२६-२७ सालातील असून २०१६ मध्ये मोठा खर्च करून तिचे खोलीकरण व कॉंक्रीटीकरण करण्यात आले होते.

त्यामुळे विहिरीची खोली ६५ फूट व रुंदी २१ फूट झाली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे विहिरीच्या आजूबाजूची माती खचली आणि भक्कम कॉंक्रीट बांधकाम कोसळले. त्यामुळे विहिरीत मोठ्या प्रमाणात गाळ व ढिगारा साचून ती जवळपास बुजली आहे.

खेडकर यांनी जोडधंदा म्हणून विहिरीत सुमारे दोन हजार कटला, कोंबडा व चिलापी जातींच्या माशांची पैदास केली होती. विहीर खचल्याने हजारो मासे मृत्युमुखी पडले असून उर्वरित माशांनाही दूषित पाण्याचा धोका निर्माण झाला आहे. या घटनेमुळे सिंचनाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. प्रशासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी पानोडी ग्रामस्थांसह शेतकरी महादू खेडकर यांनी केली आहे.

## संगमनेरमधील मंगळसूत्र चोरी उघड

### राहत्याचे दोघे जाळ्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलेचे मंगळसूत्र व सोन्याचे दागिने हिसकावून नेणाऱ्या राहाता तालुक्यातील दोघा आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून गुन्ह्यात वापरलेली कारही जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट रोजी सकाळी तुळसाबाई संपत शिरसाठ (रा. काकडवाडी, ता. संगमनेर) या बसची वाट पाहत उभ्या असताना अज्ञात चोरट्यांनी पत्ता विचारण्याचा बहाणा करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने व मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेले. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत हर्षल राजेंद्र भांबारे (वय २१) व निलेश विलास गायकवाड (वय २७, दोघे रा. कोऱ्हाळे, ता. राहाता) यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्ह्यात वापरण्यात आलेली बलेनो कार (एमएच-१७-डीसी-४८६२) जप्त करण्यात आली आहे. सुमारे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपासासाठी आरोपींना संगमनेर तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केली.

## धनगरवाडीत १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचा ध्वजारोहण

### भाविकांच्या सोयीसाठी रस्ते विकासावर सुमारे चार कोटींचा निधी : विखे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : तालुक्यातील धनगरवाडी येथे योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेल्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचा भक्तिमय वातावरणात उत्साहात शुभारंभ झाला. महंत रामगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाच्या सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.

यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. भाविकांच्या सोयीसाठी परिसरातील रस्ते विकासासाठी सुमारे चार कोटींचा निधी देत असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भाविकांना शुभेच्छा देत मंत्री विखे पाटील यांनी सद्गुरू गंगागिरीजी महाराज यांनी सुरू केलेली अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा आज लोकचळवळ बनल्याचे



सांगितले. हरिनाम, कीर्तन, प्रवचन आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचे संस्कार जपणारा हा सप्ताह हिंदू संस्कृती व अध्यात्माचा अमूल्य वारसा असून, ही ऐतिहासिक परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत अखंडपणे पोहोचत असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

सप्ताह यशस्वी करण्यासाठी सर्व भाविकांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. दरम्यान, सप्ताहाच्या निमित्ताने धनगरवाडीत मोठ्या प्रमाणावर भाविक येत असल्याने त्यांच्या सोयीसाठी महायुती सरकारच्या माध्यमातून धनगरवाडी रस्त्याच्या विकासासाठी सुमारे चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून रस्त्यांची कामे पूर्ण झाल्याने भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. अध्यात्म आणि विकास यांचा समतोल साधत धनगरवाडीच्या विकासाला गती मिळाल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

## वैजापूरच्या येवला नाका परिसरात एकावर धारदार शस्त्राने हल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : शहरातील येवला नाका परिसरात शुक्रवारी (दि. ७) सायंकाळी एका ६५ वर्षीय वृद्धावर धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली.

या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमीचे नाव गोरखनाथ आसाराम पवार (वय ६५, रा. येवला रोड, वैजापूर) असे आहे. प्राथमिक माहितीनुसार, येवला नाका परिसरात अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने त्यांच्या पायावर वार केला. हल्ल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ त्यांना वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणाची वैजापूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून हल्ल्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

वर्दळीच्या ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पंतप्रधान मोदींची खा. भाऊसाहेब वाघचौरे यांनी घेतली भेट

### शिर्डी मतदारसंघाच्या विकासकामांवर सविस्तर चर्चा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली** : शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांनी शुक्रवारी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. या भेटीत शिर्डी लोकसभा मतदारसंघातील पायाभूत सुविधांचा विकास, रेल्वे प्रकल्प, रस्ते, तसेच जनहिताशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाकडून आवश्यक सहकार्य मिळावे, अशी मागणी खासदार वाघचौरे यांनी यावेळी केली. भेटीनंतर खासदार वाघचौरे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मतदारसंघाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक सकारात्मक प्रयत्नांना केंद्र सरकारचे सहकार्य लाभेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या मार्गदर्शनातून शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या विकासासाठी अधिक जोमाने आणि परिणामकारकपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या प्रगतीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असून, विकासकामांना गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांनी दिली.

## १५९ वर्षांच्या ब्रिटिशकालीन 'लाख बंधाऱ्याला' नवे जीवन

### ४.६२ कोटींच्या निधीतून बळकटीकरण | ३७ किमी कालव्याची होणार दुरुस्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : प्रवरा नदीवरील १५९ वर्षांचा ऐतिहासिक लाख बंधारा आणि त्याला जोडलेल्या ३७ किलोमीटर लांबीच्या लाख कालव्याच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीसाठी ४ कोटी ६२ लाख ११ हजार १६५ रुपयांच्या प्रशासकीय मंजुरीला हिरवा कंदील दिला आहे.



या निर्णयामुळे दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या ऐतिहासिक सिंचन व्यवस्थेला नवसंजीवनी मिळणार असून हजारो शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. ब्रिटिशांनी सन १८६७ मध्ये उभारलेला लाख बंधारा हा महाराष्ट्राच्या जलसंपदा इतिहासातील महत्त्वाचा ठेवा मानला जातो. ३९३ मीटर लांबी, ४.७५ मीटर उंची आणि २५ दशलक्ष घनफूट पाणी साठवण क्षमता असलेल्या या बंधाऱ्याद्वारे ३७ किलोमीटर लांबीच्या कालव्यातून श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यातील सुमारे ६६०० हेक्टर क्षेत्राला खरीप व रब्बी हंगामात सिंचनाचा लाभ मिळत होता.

मात्र, ओझर, भंडारदरा आणि निळवंडे धरणांच्या उभारणीनंतर लाख बंधाऱ्यातील पाण्याची आवक घटली. परिणामी कालव्यात गाळ साचणे, अतिक्रमणे वाढणे आणि सिंचन व्यवस्था विस्कळीत होणे अशा समस्या निर्माण झाल्या.

अनेक वर्षांच्या मागणीनंतर अखेर शासनाने या ऐतिहासिक प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीस मंजुरी दिली आहे. मंजूर आराखड्यानुसार बंधाऱ्याचे बळकटीकरण, ग्राऊटिंग, कालव्याची विशेष दुरुस्ती तसेच वहन क्षमता वाढविण्याची कामे हाती घेतली जाणार आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर १०५ हेक्टर सिंचन क्षेत्र पुन्हा कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, भविष्यात परिसरातील सिंचन व्यवस्थेला नवे बळ मिळून शेती उत्पादनातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हा निर्णय प्रवरा खोऱ्यातील शेतकऱ्यांसाठी निश्चितच दिलासादायक ठरणार आहे.